
# माणूस

६ मे १९६७

चाळीस पैसे




## प्रयत्न चालू ठेवणार!



# राजा शिवछत्रपति

ब. मो. पुरंदरे

चतुर्थ आवृत्ती, सचित्र

प्रसिद्धीनंतर : मूल्य रुपये
चाळीस किमान

प्रसिद्धीपूर्व : मूल्य रुपये
सत्तावीस फक्त

पोस्टखर्च : रुपये तीन वेगळा

प्रसिद्धीपूर्व ग्राहक नोंदणीची
अखेरची मुदत : ३१ मे १९६७

**राजहंस प्रकाशन**

४१९ नारायण, पुणे २





एक समग्र साप्ताहिक

वर्ष : सहावे
अंक : चव्वेचाळीसावा
किंमत : चाळीस पैसे
वार्षिक वर्गणी : वीस रुपये

संपादक
श्री. ग. माजगावकर

संपादक मंडळ
अ. मा. साधू
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

व्यवस्था विभाग
अ. वा. गंधे
अ. वि. गणपत्ये

पत्ता – ४९१ नारायण, पुणे २.
दूरध्वनी – ५७४५१


प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

## पत्र मैत्री

स. न. एप्रिल २७

आपल्या २९ एप्रिलचे अंकातील 'ह्या देशाचे काय होणार' हा लेख वाचला.

स्वातंत्र्य मिळवून राष्ट्राची प्रगती–समृद्धी निर्माण करण्यासाठी पंचवार्षिक योजना निर्माण करण्यात आल्या. त्याचे दृश्यफळ काही ना काही दिसावयास लागलें त्याचबरोबर मिळणारे दृश्यफळ आपल्याला कायम स्वरूपात कसे राखता येईल त्याचा विचार केला गेला नाही.

आमच्या रत्नागिरी जिल्ह्यातील शेतकरी, शेताची लागवड झाल्यावर विश्रांती न घेता प्रथम तो शेताभोवताली संरक्षण निर्माण करतो. आणि मग पुन्हा आतील शेतीकडे लक्ष देतो. जे जुजबी ज्ञान साध्या शेतकऱ्यास असते ते राष्ट्राचे भवितव्य निर्माण करणारे पक्ष व राज्यकर्ते ह्यांना का असू नये ?

**गोपाळ भार्गव निमकर**, मुंबई.

स. न. एप्रिल २५

२२ एप्रिल ६७ चा 'माणूस', 'लता विशेषांक' सबंध अंकच संग्राह्य आहे. मुखपृष्ठावरचं -मा. दीनानाथांचं चित्र आणि लताच्याच गळयातून निघालेल्या 'कल्पवृक्ष कन्येसाठी...' हृदय हेलावणाऱ्या, रोमांचित करणाऱ्या त्या शब्दपंक्ती. गौरवाला साजेसं सुटसुटीत स्वरूप. पृथ्वीचा गोल लताचा गौरव करत

आहे, कौतुक करीत आहे. लताचं मधलं मन गलबलून, गहिवरून गेलं असेल. तिचं मन हुरहुरत असेल. साऱ्यांनाच हिमालय बघण्यासाठी आज "बाबा" असायला हवेत. 'माणूस'चं मुखपृष्ठ मला अतिशय सुंदर वाटलं. अंतरंग-देखील सुंदर लेखांच्या नंदादीपानं उजळून गेला आहे. दीनानाथांच्या पुण्याईची दीप्ती. बाबासाहेब पुरंदऱ्यांचं "स्वर-शिल्प" एक सुरेख कोरीव लेख, प्रा. गंगाधर गाडगीळांचा "अमृतानुभव" एक वेगळा अनोखा परिचय. लताचे कौतुक शब्दांत पकडणेच कठीण.पण 'माणूस'ने प्रतिभाशाली थोर साहित्यिकांकडून हे शब्दब्रह्म, कैलास लेण्यासारखं कोरून वाचकांपुढं साकार केलं. सहस्र धन्यवाद. 'माणूस' वाचला आणि चटकन आभार मानावेत म्हणून पत्र लिहीत आहे.

**वि. शं. गौतम**, कळमपुरी.

**स. न.** एप्रिल २५

२२–४–६७ चा 'माणूस' चा अंक वाचून मनास आनंद वाटला. खरोखरच भाग्यवान पित्याची ही भाग्यवान कन्या आज आपल्या पित्यास न लाभलेले भाग्य उजळू पाहत आहे. आपल्या कन्येला लाभलेले हे सर्वोच्च यशाचे स्थान पाहण्यास आज तो दुर्दैवी पिता नाही याचा खेद वाटतो.

अमाप संपत्ती पायाशी लोळत असतानादेखील केवळ साधेपणा अंगी असणारी ही लता मंगेशकरच का, अशी शंका निर्माण होते. तिचा पूर्ण लेख वाचून मनाला आनंद झालाच. त्या दुर्दैवी पित्यास मनःपूर्वक श्रद्धांजली आणि त्या भाग्यवान कन्येस शुभेच्छा आणि प्रणाम.

**खोगरे दिनकर**, बीड.

**स. न.** एप्रिल २४

'माणूस' चा 'लता-विशेषांक' आवडला. नेहमीचे अंकही चांगलेच असतात किंबहुना प्रत्येक अंक विशेषांकच असतो.

'भिंतीच्या तुंबड्या' 'दिल्ली दरबार', ही सदरे, तसेच नवीन सदर 'उर्दू वार्ता' मला फारच आवडतात. चित्रपट परीक्षणे चांगली असतात. अनुपमा व अफसानाची फारच आवडली.

**सौ. सुनीता कुलकर्णी**, पुणे.

**स. न.** एप्रिल २४

आपण 'माणूस'चा 'लता' संबंधी काढलेला अंक वाचण्यात आला. मी माणूस नेहमीच वाचतो. परंतु हा अंक 'आगळा' आहे. मुखपृष्ठापासून अंक उत्तरोत्तर चढत्या श्रेणीचा निघालेला आहे. लताच्या गायनाचे व जीवनाचे जे विविध पैलू आपण मांडले आहेत. ते हृद्य

आहेत. विशेषत: बाबासाहेबांचा लेख. हा अंक वाचून संपल्यावर काहीतरी वाचावयाचे अजूनही शिल्लक आहे असे वाटते. तरी ह्या अतृप्तीची तृप्ती लवकर करावी ही विनंती.

अरविंद ब्रह्मे, नागपूर.

स. न. एप्रिल २३

ता. १८–३–६७ चे अंकातील बिहार-मधील दुष्काळी भीषणता वाचून अत्यंत दु:ख झाले.

मी आर्थिक मदत करू शकलो नाही तरी, आपण मार्गदर्शन केल्यास दुष्काळाच्या जागी जाऊन इतर काही सेवा करता आल्यास मला आनंद होईल.

मला हिंदी, मराठी, उर्दू, कन्नड व इंग्लिश या भाषा उत्तम येतात.

सध्या मी सेंट्रल ऑर्डिनन्स डेपो, देहू रोड, या ठिकाणी कॅन्टीन मॅनेजर म्हणून काम करतो आहे व गेल्या पंधरा वर्षांचा या व्यवसायात माझा अनुभव आहे.

माझ्या ज्ञानाचा, अनुभवाचा जर काही उपयोग बिहार रिलीफ कमिटीस होत असेल तर मी रजा घेऊन जाण्यास तयार आहे. विचार करावा. संबंधितांस विचारावे व कळवावे.

सय्यद मुजीर, देहूरोड.

स. न. एप्रिल, २३

'माणूस' या आपल्या साप्ताहिकातील १ एप्रिलच्या अंकामध्ये बिहार वार्तापत्रातील मजकूर वाचला. बिहारमधील लोकांच्या दु:खद स्थितीची माहिती थोडक्यात काढून पत्रकाद्वारे लोकांना मोफत वाटण्याचा माझा विचार आहे. आपण बिहारमधील माहिती आपला प्रतिनिधी पाठवून समाजापुढे ठेवीत आहात, याबद्दल आपले अभिनंदन. इतर कोणत्याही वृत्तपत्रांना या परिस्थितीची किंमत वाटत नाही हे दुर्दैव होय.

डॉ. शि. ग. पटवर्धन, अमरावती.

Dear Sir, April 22

I am regular reader of your popular weekly "Manoos". I, and my friends are highly impressed by the special 'Lata Mangeshkar' Number, dated 22–4–67.

We like, "Urdu Varta" edited by Shri Khan. also. I am sorry to note that the above feature is not appeared in the special Number. However please do continue the said feature in future atleast.

A. G. Valecha, Poona.

श्री. ग. मा.

लांबवरून दहाचे टोल ऐकू येत होते. बाजूच्या स्टेशनात गाडी धडधडत शिरत होती. बहुधा सिकंदराबाद एक्स्प्रेस असावी. याच गाडीने मी दहा वर्षांपूर्वी ओरिसातील ग्रामदान पाहणीचा माझा दौरा संपवला होता. आताही मी याच चळवळीच्या उगमस्थानाकडे—गंगोत्रीकडे निघालो होतो. 'पाहणी' हा मात्र आता उद्देश नाही. कारण तिथे काय आढळेल याची पूर्वानुभवामुळे एक स्थूल कल्पना होतीच. आज मी यात्रिक होतो आणि यात्रेकरूने का कुठे काही 'पाहायला' जायचे असते! त्याने जायचे असते ते भावसमृद्धीसाठी, दृढतेसाठी—जे पाहायचे असते ते त्याचेपाशीच असते. ग्रामदान चळवळीमागील मला समजलेला, जाणवलेला भाग 'अंत्योदया'चा आहे. समाजातील अखेरच्या, तळाच्या माणसाला स्पर्श करावा, वर उचलावा ही या आंदोलनामागील नैतिक प्रेरणा मला भिडते व अविरोधाच्या, सर्वात्मकतेच्या भूमिकेवरून करण्यात आलेली या आंदोलनाची मांडणी माझ्या भारतीय मानसाला जवळची वाटते. अखेरच्या माणसाला जाग यावी ही या काळाचीच प्रेरणा आहे, हा आजचा युगविशेष आहे. जो विचार, जे आंदोलन, जो पक्ष, जे राजकारण या प्रेरणेतून उगम पावत नाही, या युगविशेषावर आधारित नाही ते आधुनिक नव्हेच. त्याची नैतिकताही सदैव शंकित आणि शबलित राहणार आहे. कम्युनिझम (समाजवाद यात आलाच) हा या प्रेरणेचे प्रतिनिधित्व

करतो म्हणून तो प्रभावी ठरतो, पुरोगामी समजला जातो—जरी या पुरोगामित्वाच्या नावाखाली कम्युनिझमने भीषण हत्याकांडे घडविली असतील, वंचनेची आणि विश्वासघाताची महापापे केली असतील. महापापे हिटलरही करतो, लेनिनही करतो. पण एकाच्या मुळाशी आधुनिक युगाची, समतेची तालस्पर्शी प्रेरणा जागी असते, दुसऱ्याच्या मुळाशी ती नसते एवढाच काय तो मौलिक, मूलभूत फरक. त्यामुळे इतिहास एकाला युगनेता मानतो, क्रांतीचा उद्‌गाता म्हणून गौरवतो, दुसऱ्याला भस्मासुर ठरवतो. हा हत्याकांडांचा, हिंसेचा, रक्तरंजित संघर्षांचा वारसा टाळून अखेरच्या माणसाला भारतात न्याय मिळवून देता येतो का ! ग्रामदान आंदोलनाच्या मुळाशी ही भूमिका होती असे मला वाटते.

ओरिसात १४०० ग्रामदाने मिळूनही हे आंदोलन का फसले याची सविस्तर चर्चा मी त्या वेळी लिहिलेल्या ‘ग्रामदानाची प्रयोगभूमी’ या पुस्तकात केली होती. या पुस्तकाचे त्यावेळी खूप स्वागतही झाले. डॉ. धनंजयराव गाडगीळांनी सोळापानी प्रदीर्घ प्रस्तावना लिहून या पुस्तकाच्या यशाला मौलिक हातभार लावला. तर पां. वा. गाडगीळांनी दोन स्वतंत्र अग्रलेख लिहून या पुस्तकाचे महत्त्व वाचकांच्या मनावर ठसवले. अग्रलेखातील पहिलेच वाक्य असे होते—“अवघ्या शंभर पानांचे हे पुस्तक असूनही हा एक मराठीतील श्रेष्ठ दर्जाचा ग्रंथ ठरावा एवढी याची योग्यता आहे

?

मार्ग

हे सुरुवातीसच आम्ही सांगून ठेवतो." अर्थात ही अतिशयोक्ती होती हे उघड आहे. कारण पुस्तकाची योग्यता मी मनोमन जाणून होतो. पण स्तुती कोणाला आवडत नाही ! डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांनी कळविले होते, " निबंध उत्कृष्ट झाला आहे. माहिती जमा करण्याची कसोशी, अवलोकन, त्यातून निष्कर्ष काढण्याची बुद्धी—सर्वच गुण यात दिसून येतात. पण याहीपेक्षा स्वतंत्रपणे चिंतन करण्याचे जे सामर्थ्य या लेखात दिसून येते ते विशेष अभिनंदनीय आहे. मला निबंध वाचून अत्यंत आनंद झाला." यातील 'स्वतंत्र' या शब्दाचा मलाही अत्यंत अभिमान वाटला होता,हे नाकारण्यात काय अर्थ आहे ? 'मौजे'ने आठ—दहा स्तंभ लिहून या पुस्तकाचा परामर्ष घेतला होता, प्रा. ठाकुरदास बंग यांनीही 'साधने'त दोन—तीन लेख तेव्हा या पुस्तकासंबधी लिहिल्याचे अंधुकसे आठवते. 'टाईम्स ऑफ इंडिया' मध्ये या एका मराठी पुस्तकावर कॉलमभर परीक्षण यावे याचे तर माझ्यासकट सर्वांनाच आश्चर्य वाटले. आता, दहा वर्षांनंतर हे त्या वेळचे पुस्तकाचे स्वागत पाहून वृत्तपत्रीय प्रसिद्धीची क्षणिकता तीव्रतेने जाणवते. आणि या क्षेत्रातच आपण गेली दहा वर्षे रमेलो ! रमतो आहोत ! तसे सगळेच क्षणिक असते म्हणा ! तरीही सापेक्षतेने जे चिरंतन आहे असे वाटते त्याचे रहस्य कशात असते ? काल कोणती अक्षरे पुसतो आणि कोणती जवळ ठेवतो ! काळालाही प्रवाहाच्या मर्यादेतच राहावे लागते. ज्याला मर्यादा नाही, जे अनंत आहे, अतीत आहे, मुक्त आहे, त्याचा काही सुवास ज्यांना लाभतो, तीच शब्दपुष्पे काल आपल्या लाटांवर आनंदाने मिरवीत नेतो काय ? का त्याचेच संगीत जो गातो, तेच सूर आणि तेच शब्द तो जतन करतो ! ज्ञानेश्वरांचा 'परस्पर्श' की मुकुंदाचा पावा ? अतीताची ओढ की आत्मगानाची आवड ! सत्याचा शोध की सुंदरतेचे ध्यान ! हा शोध तरी कसा घ्यायचा ! हे ध्यान तरी कसे धरायचे ? वाट कुणाला पुसायची !

थकला आहेस ! छे: तसे काही नाही. सकाळपासून चार तास अखंड, एकटा चाललास म्हणून कंटाळला आहेस ! कबूल. स्वाभाविक आहे कंटाळा येणं. कुठेही तोचतोचपणा आला की कंटाळाही येतोच. पण थोडी कळ काढलीस तर ही महानगराची हद्द आता संपतच आली आहे. ती एकदा ओलांड आणि मग कुठेही सावलीखाली थांब. विश्रांतीची तुला गरज आहे, विश्रांतीला तू आता पात्रही आहेस.

अपूर्ण

सरकारी गाय – आखूड दुधी, बहुशिंगी!



# दक्षिणेचे नवे दर्शन

मित्रवर्य माजगावकर २४ एप्रिल

मद्रास सोडले. मद्रासची कामगिरी श्री. पुंडलिक यांनी फारच जिद्दीने उरकली. इतकी माहिती गोळा झाली आहे की ८–१० लेख सहज होतील. मेनन पडल्याचे आजच वाचले. इथेही अनेकांना आनंद झाला आहे...... एक मात्र खरे की सगळा देश फिरल्याखेरीज राजकारणात कुणी पडू नये, बोलू नये. आपल्याला तिकडे वाटतं शिवाजी माहीत नाहीत असा माणूस नाही. इकडे खाली या. शिवाजी गणेशन झाला म्हणून आपले नाव कानावरून गेलं आहे इतकेच.

मद्रासला तामीळ लेखकांशी बातचीत खूपच रंगली. १५–१६ मोठेमोठे लेखक आले होते. शेवटी चर्चा शिवसेनेवर घसरली. शिवसेनेबद्दल आम्हांला करुणानिधी व नेडुनचे रियन या दोन्ही मंत्र्यांनी प्रश्न केले! स्टेशनवर त्रिचनापल्लीला काही विद्यार्थी भेटले. तोच प्रश्न! लोक मात्र खुशीत आहेत. टांगेवाला, रिक्षावाले, हमाल जो तो डचमकेवाला. तांदळाचा भाव रुपयाने खाली आला यामुळे आण्पांची खूपच स्तुती होते......?

स. न.


आमचा मद्रासचा मुक्काम उत्तम झाला. निरनिराळ्या थरातील जवळजवळ ४०–५० व्यक्तींच्या मुलाखती घेतल्या. दोन (चालू) मिनिस्टर्स, एक (माजी) मुख्यमंत्री, एक एम्. एल. ए., युनिव्हर्सिटीमधील हेड ऑफ दि तामिळ डिपार्टमेंट, दोन प्रोफेसर्स, विद्यार्थी आणि लेखक. Men on the street वगैरे सर्व भेटून झाले. या आधारावर लेख बरे व्हावेत असे वाटते. पहिले दोन लेख मी तुम्हांला आठदहा दिवसात पाठवितो...?

तीन साहित्यिक
नवी दक्षिण पाहावी
म्हणून दौऱ्यावर निघाले
'माणूस'ने त्याना पाठविले.
त्यांनी जे पाहिले, ऐकले, टिपले
ते सारे कांही
लवकरच 'माणूस' मधून प्रसिद्ध होईल.
हे सांगणे नलगे.

# बुद्धिमान पण विवेकभ्रष्ट

श्री. कृष्ण मेनन पुन्हा पराभूत झाले. मागील वेळेला कै. स. गो. बर्वे यांच्याकडून, या वेळेला त्यांच्या भगिनीकडून. त्यामुळे या वेळचा पराभव अधिक दारुण आहे! एखाद्या व्यक्तीच्या लोकप्रियतेला ओहोटी लागली की ती कोठपर्यंत पोचते हे यावरून स्पष्ट व्हावयास हरकत नाही. पं. नेहरू हयात असेपर्यंत ज्यांच्याविरुद्ध बोलण्याची कोणाचीही ताकद नव्हती ते मेनन आता पूर्णपणे निराधार झाले आहेत. १९५७ चे संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन ऐन जोरात होते, सगळीकडे काँग्रेस उमेदवार धडाधड कोसळत होते, त्या वेळी श्री. मेनन उत्तर मुंबईमधून लोकसभेला उभे राहिले. निवडणूक लढविण्याची त्यांची ती पहिलीच वेळ होती. परंतु त्या वेळी श्री. मेनन संयुक्त महाराष्ट्र समितीच्या उमेदवाराचा पराभव करून निवडून आले. १९६२ मध्ये आचार्य कृपलानींसारखा मान्यवर कार्यकर्ता त्यांच्याविरुद्ध मोठ्या जिद्दीने उभा होता. जनसंघ-समाजवादी आदी पक्षांनी कृपलानींच्या बाजूने उभे राहण्याचे ठरविले होते. तशाही परिस्थितीत मेनन यांनी कृपलानी यांच्यावर मात केली. परंतु नंतर पंडितजींचे निधन झाले आणि मेनन एकाकी पडले. इतके की ज्या मतदार संघातून ते दोनदा निवडून आले होते, त्या मतदार संघात त्यांना तिकीट देण्यासही मुंबई प्रदेश काँग्रेसने नकार दिला. कामराज आणि इंदिरा गांधी यांच्या आग्रहाला धुडकावून श्री. स. का. पाटील यांनी मेनन यांना तिकीट नाकारले.

एकाकी अवस्थेतही मेनन यांचा हेकट स्वभाव कायम होता. लोकसभेवर निवडून येणे या मुख्य उद्दिष्टाऐवजी उभा राहीन तर ईशान्य मुंबईतूनच, अशी आग्रही भूमिका त्यांनी स्वीकारली. इतर कोणतेही तात्त्विक मतभेद नसताना ते काँग्रेसमधून बाहेर पडले व अपक्षीय उमेदवार म्हणून ते निवडणुकीच्या रिंगणात उतरले. त्यांच्याविरुद्ध निवडणूक-तंत्राशी अपरिचित असणाऱ्या स. गो. बर्वे यांना काँग्रेसने म्हणजे स. का. पाटील यांनी उभे केले. वस्तुत: निवडणूक-तंत्र म्हणून जी काही चीज ओळखली जाते त्यात पाटील पहिल्यापासून वाकबगार, पण गेल्या फेब्रुवारीत जी निवडणूक झाली तीत पाटील पराभूत झाले आणि त्यांनी उभे केलेले स. गो. बर्वे अतिशय चुरशीच्या निवडणुकीत विजयी झाले. त्या वेळी मेनन यांनी आपला पराभव खिलाडूपणाने मान्य केला. परंतु स. गो. बर्वे यांचे आकास्मिक



निधन झाले आणि पुन्हा ईशान्य मुंबईत पोटनिवडणूक घेण्याची पाळी आली. या वेळी मेनन पुन्हा निवडणुकीस उभे राहतील, अशी शक्यता वाटत नव्हती. परंतु मागील पराभवाचे शल्य मनाला बोचत असल्यामुळे मेननसाहेबांनी पुन्हा उमेदवारीचा अर्ज भरला. या वेळेला स. का. पाटील यांनी सौ. ताराबाई सप्रे यांच्यासारख्या मतदारांना सर्वस्वी अपरिचित असणाऱ्या व्यक्तीला आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या मेनन यांच्याविरुद्ध उभे केले. कै. स. गो. बर्वे यांच्या भगिनी याशिवाय सौ. सप्रे यांच्या बाबतींत अधिक काहीही सांगता येण्यासारखे नव्हते. सौ. सप्रे यांना एकच गोष्ट अनुकूल होती व ती म्हणजे जनसंघ, स्वतंत्र व प्र. स. या तीन पक्षांनी त्यांच्या उमेदवारीला पाठिंबा दिला होता. याउलट संपूर्ण महाराष्ट्र समितीने मेनन यांच्या उमेदवारीचा पाठपुरावा करण्यास प्रारंभ केला.

कृष्ण मेनन विरुद्ध सौ. ताराबाई सप्रे या निवडणुकीत कोण विजयी होणार हे प्रामुख्याने ठाणे आणि कल्याण मतदारसंघांतच ठरावयाचे होते. कारण कुर्ला, घाटकोपर, चेंबूर व मुलुंड या चार मतदारसंघांत मागील खेपेसही मेनन यांनी आघाडी मारलेली होती. या वेळेसही ते ही आघाडी कायम राखतील हे ठरल्यासारखेच होते. त्यामुळे सप्रेबाईंची सारी मदार होती ती ठाणे-कल्याण या भागावर आणि शेवटी याच दोन मतदारसंघांतील नागरिकांनी इतर चार मतदारसंघांतील सतरा हजार मतांची तूट भरून काढून आणखी पंधरा हजार मते सप्रेबाईंच्या पदरात टाकली.

## समाजवादी विसंगती

आपल्याला ठाणे-कल्याण भागातून दगाफटका होण्याचा संभव आहे, हे मेनन यांना प्रारंभापासून माहीत होते आणि तो दगाफटका टाळण्यासाठीच त्यांनी संपूर्ण महाराष्ट्र समितीच्या पाठिंब्याची याचना केली होती. काँग्रेसविरोध या एकाच भूमिकेवरून समितीने मेनन यांना पाठिंबा देण्याचे ठरविले; परंतु गमतीची गोष्ट अशी की ज्या कम्युनिस्ट पक्षाने मेनन यांच्या उमेदवारीचा हिरीरीने पुरस्कार करावयाचा तो पक्ष या वेळी गप्प बसला आणि १९६२ च्या निवडणुकीच्या वेळी मेनन यांच्यावर देशद्रोही वृत्तीचा शिक्का मारणाऱ्या संयुक्त समाजवादी ( त्या वेळचा समाजवादी ) पक्षाने मेनन यांचे गोडवे गाण्यास प्रारंभ केला.

चिनी आक्रमणाच्या वेळी भारताला जी मानहानी पत्करावी लागली त्या वेळी मेनन यांच्याविरुद्ध लोकक्षोभाची जी जोरदार लाट उसळली होती तीवर समाजवादी नेते स्वार झाले होते. मेनन यांच्याविरुद्धचा हा लोकक्षोभ अनाठायी होता, असे त्यानंतर काहीही सिद्ध झाले नसताना प्रत्यक्ष समाजवादी पक्षाच्या एस. एम. जोशी, जॉर्ज फर्नांडिस प्रभृति नेत्यांनी या वेळी मेनन यांची भलावण करण्यासाठी पुढे यावे यात तात्त्विक सुसंगती शोधूनही सापडणार नाही. मला वाटते, सध्या या पक्षाचा एकच कार्यक्रम, आपण लढाऊ आहोत हे दाखविण्याचा. परंतु तत्त्वशून्य लढाऊ वृत्ती कोणत्याही पक्षाला फारशी पुढे नेत नाही याचा वारंवार पडताळा आला आहे. परंतु सध्या तरी संयुक्त समाजवादी पक्ष असा कोणताही विचार करण्याच्या मन:स्थितीत दिसत नाही. आणि म्हणूनच राष्ट्रवादी शक्तींपेक्षा कम्युनिस्ट शक्तींशी हा पक्ष अधिक जवळीक निर्माण करीत आहे. नाही तर पुण्यातील निवडणुकीनंतर आपल्या विजयाचे श्रेय कोणाकोणाला आहे हे सांगताना 'मुशावरत'चा उल्लेख करणाऱ्या एस. एम. यांना शुक्रवार पेठ मतदार संघात भरगच्च आघाडी मिळवून देणाऱ्या जनसंघाचे नाव घ्यावयास संकोच वाटला नसता. असो.

## भुई धोपटण्याचा प्रकार

स. का. पाटलांना पराभूत करणारे 'दैत्यसंहारक' जॉर्ज फर्नांडिस काय किंवा प्रांजल आणि नि:स्पृह वृत्तीबद्दल प्रसिद्ध असलेले एस. एम. काय! ठाणे-कल्याण भागातील महाराष्ट्रीय मतदारांना मेनन यांच्या बाजूने खेचण्यास असमर्थ ठरले! या साऱ्या प्रकाराबद्दल मेननमहाशय शिवसेनेवर संतापले आहेत. शिवसेनेने तीस हजार खोटे मतदान केले व आपल्या तीस हजार मतदारांना मतदानासाठी जाऊ दिले नाही, असा त्यांचा आरोप आहे. मुंबईतील सर्वसामान्य महाराष्ट्रीयाला शिवसेनेबद्दल आपुलकी वाटते हे मान्य करूनही केवळ शिवसेनेमुळे आपला विजय हुकला असे जे मेनन भासवीत आहेत त्यावरून कोणाचे समाधान होणार असेल ते होवो; परंतु या विधानात सत्यापेक्षा भाग्याचाच भाग अधिक आहे हे नाकारता येणार नाही. ईशान्य मुंबईतील मतदारांनी सौ. सप्रे यांना विजयी करून काँग्रेसच्या बाजूने आपला कौल दिला आहे हे म्हणणेही तितकेच असत्य आहे. या मतदारांनी व्यक्तिश: मेननविरोधी कौल दिला असे म्हणणेच वस्तुस्थितीशी सुसंगत ठरणार आहे! चिनी आक्रमणाच्या वेळी भारताचा जो केविलवाणा पराभव झाला त्याला बऱ्याच प्रमाणांत कृष्ण मेनन यांनाच जबाबदार धरण्यात येते व तेव्हापासून आपली आंतरराष्ट्रीय ख्यातीची प्रतिमा फार मोठ्या प्रमाणावर डागळली गेली आहे हे ध्यानात घेण्याऐवजी शिवसेनेवर आग ओकून पुन्हा एखादी पोटनिवडणूक झाली तर तीत भाग घेण्याची आपली खुमखुमी मेनन यांनी जाहीर केली आहे.

१९४७ पूर्वी मेनन यांचे वास्तव्य लंडनमध्ये होते. भारतीय स्वातंत्र्याबाबत ब्रिटिश जनमत तयार करण्यासाठी त्यांनी त्या वेळी मोलाची कामगिरी बजावली

होती. १९४७ नंतर काश्मीरवरील पाकिस्तानी आक्रमणासंबंधी सुरक्षा समितीत जी चर्चा झाली त्या वेळी भारताची बाजू मांडण्याची कामगिरीही मेनन यांनी चोखपणे बजावली. १९५७ व १९६२ च्या निवडणुकीत त्यांना आपल्या या कर्तृत्वाची पुण्याई खचित् उपयोगी पडली. पक्षसंघटनेत काहीही स्थान नसताना पं. नेहरूसारखा लोकोत्तर नेता पाठीशी असल्यामुळे मेनन यांना आपल्या सहकाऱ्यांचा वा मतदारांचा अनुनय करण्याची गरज भासली नाही. परंतु चिनी आक्रमणाच्या वेळी त्यांच्याविरुद्ध जो लोकक्षोभ झाला तेव्हा पं. नेहरूंसारखा नेताही त्यांना वाचवू शकला नाही. पंडितजींच्या निधनानंतर तर मेनन यांच्या नशिबी एकांतवास आला. लोकसभेत ते निवडून गेले असते तरीही विरोधी पक्षांपैकी कोणाशीही त्यांचे जमण्यासारखे नव्हते. शिवाय काँग्रेस पक्षाचा त्याग करताना त्यांना अहंकाराशिवाय दुसरे कोणतेच कारण नव्हते. या अशा अनेक कारणांमुळे आपण पराभूत झालो आहोत हे ओळखण्याऐवजी इतरांवर राग काढून मेनन साप साप म्हणून भुई धोपटण्याचाच प्रकार करीत आहेत! माणूस कितीही मोठा असला तरी त्याला कोठे थांबावे हे कळतेच असे नाही, हे मेनन यांनी पुन्हा एकदा सिद्ध केले आहे एवढे मात्र नक्की. □

## भा. कृ. केळकर यांची निवृत्ती

दिल्लीतील महाराष्ट्र परिचय केंद्राचे प्रारंभापासूनचे मुख्याधिकारी श्री. भा. कृ. केळकर सहा वर्षांनंतर या जबाबदारीतून १ मेपासून मुक्त झाले असून ते पुन्हा आपल्या माहिती–नभोवाणी खात्यात दाखल झाले आहेत. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर दिल्लीसारख्या राजधानीच्या शहरात महाराष्ट्राची सांस्कृतिक वकिलात स्थापन करावयास हवी ही कल्पना श्री. केळकर यांचीच. त्यांनी ती त्या वेळचे मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांच्यापाशी बोलून दाखविताच श्री. चव्हाण यांनाही अशा संस्थेची आवश्यकता पटली व वर्षाभराच्या आतच म्हणजे १ मे १९६१ रोजी दिल्लीमध्ये राज्य सरकारतर्फे महाराष्ट्र परिचय केंद्र स्थापन करण्यात आले. या केंद्राला सरकारी कचेरीचे स्वरूप न येता दिल्लीत राहणाऱ्या व दिल्लीस येणाऱ्या महाराष्ट्रीयांच्या व महाराष्ट्रासंबंधीच्या अन्य भाषिकांच्या गरजा ओळखून त्यानुसार जनसंपर्कात्रे कार्य करणारी यंत्रणा असे त्यांचे स्वरूप राहावे, अशी श्री. चव्हाण यांची इच्छा होती व म्हणून त्यांनी या केंद्राची जबाबदारी श्री. केळकर यांच्यावरच सोपविली. श्री. केळकर यांना केंद्रीय माहिती नभोवाणी खातेही प्रारंभी सोडावयास तयार होईना. परंतु दिल्लीत नव्यानेच उभ्या राहत असलेल्या परिचय केंद्रात त्यांची अधिक गरज आहे, हे ओळखून त्या वेळचे नभोवाणीमंत्री श्री. बाळकृष्ण केळकर यांनी परवानगी दिली.

तेव्हापासून गेली सहा वर्षे या केंद्राच्या सर्वांगीण वाढीसाठी श्री. केळकरांनी जे परिश्रम घेतले त्याचा केवळ महाराष्ट्रीयन नेत्यांनीच नव्हे तर बी. गोपाळ रेड्डी यांच्यासारख्या परभाषिक नेत्यानेही गौरव केला. महाराष्ट्र परिचय केंद्राचे कामकाज पाहून त्या आधारे इतर राज्यांनीही दिल्लीत आपली परिचय केंद्रे स्थापन केली. यावरून श्री. केळकरांचे कार्य भारतीय एकात्मता स्थापण्याच्या दृष्टीने आवश्यक आहे याची कल्पना येते. श्री. केळकर मूळचे पत्रकार असल्यामुळे त्यांनी प्रारंभापासूनच या केंद्राचे स्वरूप एकसाची न ठेवता महाराष्ट्रीय संस्कृतीची अन्य भाषिकांना ओळख होईल असे कार्यक्रम आखण्यास प्रारंभ केला. कै. हरिभाऊ आपटे यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने भरवलेले प्रदर्शन हैदराबादला नेण्यात त्यांनी जी धडाडी व उपक्रमशीलता दाखविली तिचे सर्वांनीच मोकळ्या मनाने कौतुक केले.

## सरकारी कचेरी होऊ नये

अशा तऱ्हेने गेली सहा वर्षे या केंद्राच्या उभारणीसाठी अविरत प्रयत्न केल्यानंतर केंद्राचे मुख्याधिकारी म्हणजे श्री. केळकर यांची नेमणूक कायम होईल, अशी आशा होती. त्या दृष्टीने महाराष्ट्र सरकारने बोलणीही सुरू केली होती; परंतु गेल्या महिन्यात अचानक कोणती चक्रे फिरली कोणास ठाऊक! परंतु ही बोलणी अयशस्वी झाली व श्री. केळकरांची कायम नेमणूक करून त्यांच्या प्रयत्नांचा गौरव करण्याऐवजी महाराष्ट्र सरकारने त्या जागी श्री. माथुर यांच्यासारख्या महाराष्ट्रीयेतराची नेमणूक केली. सर्वच ठिकाणी महाराष्ट्रीय-महाराष्ट्रीयेतर असा भेद करून चालण्यासारखे नसते ही गोष्ट खरी असली तरी महाराष्ट्रीय संस्कृतीचा परिचय करून देणाऱ्या केंद्राची सूत्रे महाराष्ट्रीय व्यक्तीकडे असणेच अपरिहार्य ठरते. त्यांतही श्री. भा. कृ. केळकर यांनी ही जबाबदारी अतिशय कार्यक्षम रीतीने सांभाळली होती. या परिचय केंद्राच्या मुख्याधिकाऱ्याच्या पदावर त्यांची कायम नेमणूक होणे उचित होते. परंतु तसे घडले नाही. त्यामुळे श्री. केळकर आता माहिती नभोवाणी मंत्रालयात परतले आहेत. केळकरांसारख्या कल्पक आणि उत्साही कार्यकर्त्यांच्या कर्तृत्वाला तेथेही चांगला वाव मिळेल, अशी आशा आहे.

महाराष्ट्र सरकारकडून अपेक्षा एवढीच आहे की महाराष्ट्र परिचय केंद्राचे सध्याचे जे सांस्कृतिक संपर्काचे स्वरूप आहे तसेच कायम ठेवण्याची दक्षता घेण्यात आली पाहिजे. नाही तर मुख्याधिकारी बदलला की लगेच या केंद्राची सरकारी कचेरी व्हावयाची आणि मग सध्या दिल्लीस येणारे-जाणारे विविध क्षेत्रांतील लोक ज्या आपुलकीच्या भावनेने तेथे जातात त्याऐवजी सरकारी फायलींचा ढिगारा वाढायचा आणि आल्यागेलेल्यांची एक दोन तुटक उत्तरांतच बोळवण व्हावयाची!! असे होणार नाही अशी आशा बाळगू या. कारण व्यक्ती बदलली तरी केंद्राचे मूळ उद्दिष्ट विसरले जाता कामा नये.

—सदाशिव पेठकर

# विचार वारे
• समीर

## □ दोन देशांत साहित्याचा पूल

भारत आणि पश्चिम जर्मनी या दोन देशांत सौहार्द वाढविण्यासाठी साहित्याचा उपयोग करण्याची कल्पना मागे एका जर्मन प्रकाशकाने मांडली होती. तिचा उल्लेख या सदरात केला होता. तीच कल्पना घेऊन आणखी एक पश्चिम जर्मन प्रकाशक नुकतेच भारताच्या भेटीला आले होते. त्यांचे नाव हॉर्स्ट अर्डमान असे असून साहित्याच्या बळावर पश्चिम जर्मनी आणि आशियाई, आफ्रिकन व दक्षिण अमेरिकन देश यांच्यामध्ये सौहार्दाचे पूल बांधायचे हे त्यांच्या प्रकाशन–संस्थेचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी ही संस्था जर्मन लेखकांचे इतर देशांतल्या भाषांतून व त्या देशांतल्या लेखकांच्या कृतींचे जर्मन भाषेत भाषांतर करते.

भारताचे उदाहरण घ्यायचे झाले तर काही निवडक आधुनिक जर्मन लेखकांच्या पुस्तकांची हिंदी, तामीळ व तेलगू भाषांत भाषांतरे करण्याची व्यवस्था झाली आहे व इतर भारतीय भाषांची व्यवस्था करण्याचा प्रयत्नही चालू आहे. उलट तामीळ तेलगू, पंजाबी, बंगाली, कश्मीरी, आसामी इत्यादी भारतीय भाषांतल्या कथांचे एक संकलन जर्मन भाषेत प्रकाशित करण्यात आले आहे.

या योजनेत आधुनिक साहित्यावर मुद्दाम भर देण्यात आला आहे; कारण जुन्या उत्कृष्ट वाङमयाचे साधारणपणे एका भाषेतून दुसऱ्या भाषेत भाषांतर होत असतेच, परंतु आधुनिक साहित्य मात्र प्रसंगी उत्कृष्ट दर्जाचे असूनही परभाषिकांना अज्ञात राहते. शिवाय आधुनिक साहित्यात त्या समाजाच्या आधुनिक विचारांचे प्रतिबिंब पाहायला मिळते यात शंका नाही.

भारतीयांना काव्यात जे स्वारस्य वाटते ते खरोखरीच लक्षात घेण्याजोगे आहे. “ माझ्या देशात आता हे काव्य-प्रेम आढळत नाही. ”

## □ समाज-कल्याणाची जागतिक समस्या

समाज-कल्याण ही एक विविधांगी समस्या आहे व भारतात ज्याप्रमाणे समाज-कल्याणासाठी निरनिराळ्या योजना राबविण्याचा प्रयत्न चालू आहे, तसाच इतर मागासलेल्या आशियाई देशांतही चालू आहे. मलेशियातील एक आघाडीचे समाज-

सुधारक सियाव लूंग लिन हे नुकतेच दिल्लीला आले होते. तेव्हा त्यांनी आपल्या देशातील समाज-कार्याची माहिती दिली. सध्या मलेशियात "सुसंगत सामाजिक धोरणाचा संपूर्ण अभाव आहे." पण परिस्थिती हळूहळू सुधारत असून काही वर्षांत समाज-कल्याणाच्या प्रश्नाला देशाच्या विकास-योजनेत योग्य ते स्थान मिळेल अशी आशा आहे. सध्या मात्र या कार्यासाठी सरकारी अंदाजपत्रकात फारच थोड्या पैशाची म्हणजे केवळ तीस लाख डॉलरची तरतूद आहे.

हिंदुस्थानाप्रमाणे मलेशियातही खेड्यांतल्या जनतेचा लोंढा अधिक पैशाच्या अभिलाषेने शहरांकडे वाहत आहे, त्यामुळे शहरे सारखी वाढत आहेत. तेव्हा शहरांचे "पोट फुटायची "पाळी यायच्या आत नगर-विकासाचा प्रश्न हाती घेणे आता मलेशियात अगत्याचे झाले आहे. "तुमच्याही देशात ही निकड भासते का ?"

लिन हे पार्लमेंट-सदस्यही आहेत. त्यांनी देशाच्या राजकारणात प्रतिपक्षाचे स्थान काय यावर प्रकट केलेले विचार :

मलेशियातील पार्लमेंटमध्ये विरोधी पक्ष प्रभावी नाही. पण ही गोष्ट अपरिहार्य आहे; कारण तो संख्येने फारच लहान आहे. विरोधी पक्ष प्रभावी व्हायचा असेल तर त्याला संख्याबळाची नितांत आवश्यकता आहे. विरोधी पक्ष जास्तीत जास्त काय करू शकतो, तर सरकारवर वाग्बाण सोडून शक्य तेवढ्या अधिक मंत्र्यांची भंबेरी उडवू शकतो. एखादा लाचखाऊ मंत्री किंवा एखादा अप्रामाणिक अधिकारी शोधून काढणे ही प्रतिपक्षाच्या यशाची सीमा असते ! परंतु एखाद्या दुसऱ्या व्यक्तीचा पाडाव करणे हे काही प्रतिपक्षाचे सर्व कार्य नाही. लोकशाहीची जोपासना करण्यासाठी नवीन सरकार स्थापित करण्याच्या उद्देशाने सिद्ध व संघटित असणे हे प्रतिपक्षाचे ध्येय असले पाहिजे.

## □ साक्षरताप्रसाराचे ध्येय काय ?


सुमारे १५–२० वर्षांपूर्वी साक्षरता हेच एक ध्येय समजले जाई, पण आता ते तसे मानले जात नाही. आता साक्षरता हे व्यक्तीच्या मनात नवीन वृत्ती बाणविण्याचे साधन आहे, असे मानले जाते; कारण या वृत्तीच्या बळावर माणूस आपली सामाजिक व आर्थिक परिस्थिती सुधारू शकतो, असे विचार एक ख्यातनाम अमेरिकन शिक्षणशास्त्रज्ञ आर्नोल्ड ब्राउन्स्टीन यांनी थोड्या दिवसांपूर्वी भारत-भेटीत दिल्लीला प्रकट केले. "आपली परिस्थिती सुधारण्यासाठी आणखी काय करायला पाहिजे, याचे ज्ञान व्यक्तीला साक्षरतेच्या माध्यमातून मिळते." अमेरिकेसारख्या साक्षर देशातही प्रौढ-शिक्षणाचा प्रश्न बराच आहे. अमेरिकेत हा प्रश्न देशव्यापी नसून स्थानिक आहे. पण तो आहे हे निश्चित.

●

## जिथे उमलावी

जिथे उमलावी प्रसन्न गहिरी
सोनकळी मधु स्मित पहाट
तिथे मनाच्या तंबूमध्ये
काळोखाचा शिरला उंट
प्रशांत प्रवाही ओघ असावा
तिथे साचले गढूळ डबके
आपसूक मनकळी खुलावी
तिथे मनातिल भाव बोलके
नको नको ते बने आगंतुक
हवे तयाशी जुळे न नाते
संधिकालची मूक प्रार्थना
मनात माझ्या टिटवी गाते !

—*ना. दि. देशमुख*



## थेम्बावळ

रात्र अंधारी भयाण
वीज लवते आकाशी
दिशा दिशा दीपवुनी
मिठी मारी अवनिशी... !
रात-राणीच्या कवेत
हट्टी वारा झेपावतो
काळोखाच्या पदरांत
मंद मंद पेंगुळतो ...!
लक्ष काजव्यांच्या ज्योती
हेलावती तमातून
रातकिडयांची सनई
आलापिते उल्हासून...!
अशा नीरव अंधारी
व्याकुळते अंतराळ
मधूनच लयवेडी
झंकारते थेम्बावळ...!!

—*अ. शे. देशमुख*

## हवी फक्त बेभान तू या करी !

नको राज्य वा राजसत्ता विलोभी
नको इंद्रचंद्रादि विश्वंभर
नको स्वर्गिच्या अप्सरा, चारुगात्री
हवा फक्त हाती तुझा हा कर !
नको गायनाची उभी रागदारी
नको कोकिळेचा इथे सुस्वर
नको बुल्बुलाचे सुखासीन गाणे
हवा फक्त कानी तुझा गे स्वर !
नको श्वास आता गुलाबी पऱ्यांचे
नको स्निग्धसे कोवळे चांदणे
नको वास आता मनाला फुलांचा
हवी फक्त वेडी तुझी स्पंदने !
नको मेनका, ऊर्वशी, मत्स्यगंधा
नको कामिनी वा कुणी शर्वरी
नको रागिणी, मानिनी, दामिनी वा,
हवी फक्त बेभान तू या करी !

—*अवधूत मालेकर*

# आस्वाद

काय नको हे सांगताना जणू काय हवे असायला पाहिजे, याचे वर्णन करण्यास एक प्रकारचे चातुर्य लागते. अवधूत भालेकर यांनी " हवी फक्त बेभान तू या करी " या कवितेत हे चातुर्य चांगल्या प्रकारे दाखविले आहे. प्रथम आणि शेवटी झालेली अप्सरांची गर्दी थोडी हटवायला पाहिजे होती; पण बुलबुल, पऱ्या, चांदणे इत्यादी प्रेम—साम्राज्यातील सारे मानकरी शोभून दिसतात. हे सारे वर्णन धुंद करणारे आहे; पण प्रियतमा ही या साऱ्या सौंदर्य-समुच्चयाहून अधिक मधुर आणि अधिक हवीशी आहे. हा निष्कर्ष रसिकांना मान्य व्हायला हरकत नाही. काय हवे हे सांगताना कर, स्वर, स्पंदने अशी चढती वाढती मांडणी केली आहे; त्यामुळे कवितेचा रंग वाढत जातो. उपान्त्य ओळ विशेष नादमधुर वाटते.

जे व्हावे असे वाटते ते होत नाही, हे दु:ख माणूस एक वेळ पत्करील; परंतु बरोबर त्याच्या उलट विपरीत होत राहणे ही अत्यंत दु:खाची गोष्ट होय. ' हवे तयाशी जुळे न नाते ' या हुरहुरीशी असंख्य लोक समरस होतील. ना. दि. देशमुख यांनी " जिथे उमलावी " या कवितेत अनेकांच्या दु:खाला वाचा फोडली आहे. पण कवितेच्या तोंडालाच एक मात्रा जास्त पडली आहे. ' मनकळी खुलावी ' याच्या विरुद्ध बोलके भाव हे काही नीट जमत नाही. मनाच्या तंबूमध्ये काळोखाचा उंट शिरला ही कल्पना वाखाणण्यासारखी आहे. पण पहिल्या ओळीतला हा घवघवीतपणा पुढे टिकत नाही. मात्र कवीला काय म्हणावयाचे आहे ते किंवा जो परिणाम करावयाचा आहे तो बरोबर होतो हे कवितेचे यश म्हणता येईल.

" थेंबावळ " हे अ. शे. देशमुख यांच्या कवितेचे शीर्षक वाचून मौज वाटते. आणि माणूस कविता वाचायला प्रवृत्त होतो. थेंबांची माला या अर्थाने हा शब्द बरा बसला आहे. तथापि ही ' थेंबावळ ' वळवाच्या पावसाची असावी असे दिसते. रातराणीच्या कवेत झेपावणारा वारा, काळोखाच्या पदरात कसा पेंगुळतो हे एक गूढ आहे हे प्रतिमान उलट केले असते तर खरी बहार झाली असती. काळोखाच्या-ऐवजी रातराणीच्या पदरात हा शब्दप्रयोग खुलून दिसला असता. रातकिड्याची सनई म्हणण्यापेक्षा वाद्यवृंद म्हटला असता तर ते वास्तवाला अधिक धरून झाले असते ! शब्दांच्या नादाने कवी वेडावलेला दिसतो. पण हे वेड आशयाला खंडित किंवा विकृत करणारे ठरू नये. मात्र सर्व कवितेला मिळून एक प्रकारची गती आहे आणि ती स्वैर नसून लयबद्ध आहे हे खास.

*गोपीनाथ तळवलकर*

वार्तालेख

# आ सा म

## घूसखोर का हाकलले जात नाहीत ?

गोहत्तीमधील आसाम प्रदेश काँग्रेस कमिटीच्या कचेरीत आम्ही दोन तास बोलत बसलो होतो. आसाममधील पहाडी प्रदेशांचा प्रश्न किती विकट आहे, हे अध्यक्ष श्री. शरत्चंद्र सिन्हा मला अगदी मनापासून समजावून सांगत होते. माझ्या प्रश्नांचे, शंकांचे समाधान करीत होते. श्री. सिन्हा यांची आणि आसाम काँग्रेसची या समस्येवरील भूमिका मला पूर्णपणे कळून चुकली होती.

मग मी विचारलं, "ठीक आहे, हा प्रश्न झाला आता. पण पाकिस्तानी आक्रमणाचं काय ?"

इतका वेळ जवळच्याच कोचावर एक वयस्क गृहस्थ वृत्तपत्र वाचीत बसले होते. आतापर्यंत त्यांनी आमच्या चर्चेत मुळीच रस घेतला नव्हता; पण पाकिस्तानी आक्रमणाचा प्रश्न निघताच ते एकदम कान टवकारून, वृत्तपत्रांतून डोके वर काढून माझ्याकडे पाहू लागले.

आमची दोन-चार प्रश्नोत्तरे होताच ते एकदम उखडून म्हणाले, "तुमची काय कल्पना आहे किंवा तुमचा रोख काय आहे हे आम्हांला पूर्णपणे ठाऊक आहे. आम्ही आसामी लोक पाकिस्तानी मुस्लिमांना मुद्दाम आत बोलावतो आणि एक दिवस सारा आसाम पाकिस्तानला देऊन टाकणार हीच तुमची कल्पना आहे ना ? असंच तुम्हांला म्हणायचं आहे ना ? बोला— बोला— असंच तुम्ही म्हणणार ! नाही तरी सगळीकडे आमच्याविरुद्ध असाच प्रचार चालू आहे !"

२



# निवडणुका जिंकणे अधिक महत्त्वाचे आहे!

मी थोडासा अवाक् होऊन त्यांच्याकडे पाहू लागलो आणि म्हणालो, "तुम्ही काय म्हणता आहात ते मला काहीच कळत नाही. एकतर तुम्ही सांगता ही माहिती मलाच नवीन आहे. आणि हा प्रचार खरोखर मी तुमच्याच तोंडून प्रथम ऐकला."

"काय सांगताय!–" ते गृहस्थ म्हणाले, "आम्ही दिल्लीला गेलो म्हणजे सारे लोक आम्हांला भंडावून सोडतात. तुमच्या महाराष्ट्रातलेच ते ××× मला विचारत होते." पूर्वी काँग्रेस आमदार आणि आता विरोधी खासदार असलेल्या एका प्रथितयश मराठी माणसाचं नाव त्यांनी घेतलं.

त्यांचा आवेश आणि त्यांची पोटतिडिक बघून मला कुतूहल वाटलं. आणि विचारलं, "माफ करा, माझी चूक होत नसेल तर...... आपण मुस्लिम का?"

ते गृहस्थ खो खो हसू लागले. श्री. सिन्हा आणि त्या खोलीत असलेले इतर एक-दोघेही हसू लागले. मग श्री. सिन्हा हसत हसतच म्हणाले, "गैरसमज करून घेऊ नका. ते अतिशय कर्मठ असे उच्चवर्णीय ब्राह्मण आहेत. ओळखच करून देतो. हे आहेत श्रीमन प्रफुल्ल गोस्वामी, आसाम काँग्रेसचे माजी अध्यक्ष. हे श्री. एस्. नंदी, ए. आय. सी. सी. चे सदस्य. आणि या श्री. माफीदा बेगम, माजी खासदार. या नेहमी संपूर्ण हिंदू मतदारसंघांतून निवडून येत."

आमची चर्चा तेवढ्यावरच थांबली. श्री. गोस्वामी यांनी नंतर आस्थेने बरीच विचारपूस केली. श्री. सिन्हा यांनी या विषयावर पुन्हा एकदा दीर्घ चर्चा करण्याचे आश्वासन दिले आणि बैठक मोडली.

६ मे १९६७

पण एक गोष्ट मात्र माझ्या ध्यानात आली. आणि पुढे निरनिराळ्या राजकीय पक्षांच्या पुढाऱ्यांशी चर्चा करताना खात्रीही पटली, की आसामी लोक– विशेषतः त्यांच्यातील एक गट–पाकिस्तानी आक्रमणाच्या प्रश्नावर अतिशय 'टची' आहेत. हा विषय नुसता चर्चेसाठी काढला, की ते नर्व्हस होतात आणि आपला मुद्दा पटवून देण्यासाठी जोरजोराने बोलू लागतात. ही गोष्ट मला फार तीव्रतेने जाणवली.

आणखी एक जाणवले. "कुठली समस्या अधिक गंभीर आणि धोक्याची. पहाडी प्रदेशांची की, पाकिस्तानी आक्रमणाची ?" या प्रश्नावर एक जनसंघ सोडला तर झाडून साऱ्या राजकीय कार्यकर्त्यांचे उत्तर ठरलेले– "अर्थात पहाडी प्रदेशाचा". आणि काही अपवाद वगळता साऱ्या पत्रकारांचेही उत्तर ठरलेले, "दोन्ही प्रश्न सारख्याच तोलाचे, पण पाकिस्तानी आक्रमणाचा तातडीने गंभीरपणे विचार केला नाही तर, वाईट परिणाम होतील."

जे अनेक प्रश्न आसामची आणि साऱ्या भारताची डोकेदुखी होऊन बसले आहेत, त्यांमध्ये पूर्व पाकिस्तानातून आसामात होणारे मुस्लिमांचे आक्रमण हा अत्यंत निकडीचा प्रश्न आहे. प्रजा समाजवादी पक्षासारखे काही राजकीय पक्ष हा प्रश्नच आता अस्तित्वात नाही, असे सांगत असले तरी ही समस्या अत्यंत अक्राळ विक्राळ स्वरूपात आसामपुढे उभी आहे. आणि स्थानिक राजकारण, समाजकारण यांमुळे या समस्येची गुंतागुंत वाढत गेली आहे. आसामच्या नेतेपदी निवड झाल्यानंतर आसामचे मुख्यमंत्री श्री. बिमलप्रसाद चालिहा यांनी ही आक्रमणाची समस्या गंभीर असल्याचे एका पत्रपरिषदेत कबूल केले होते; पण त्याचबरोबर असेही सांगितले होते की, "बाबांनो, हे आक्रमण थांबविण्यासाठी आणि बेकायदा घुसलेल्या पाकिस्तान्यांना परत पाठविण्यासाठी माझे सरकार जारीने उपाय योजील. पण तुम्ही मात्र उगाच या प्रश्नाला विशेष प्रसिद्धी देऊ नका. कृपा करून गप्प बसा म्हणजे आम्हांला आमचे काम करणे सोपे जाईल."

श्री. चालिहा यांना अशी भूमिका का पत्करावी लागते यामागे आसामी राजकारणाचा फार मोठा इतिहास आहे. आणि आक्रमण नाहीसे करण्याचा प्रयत्न वाटतो तेवढा सोपा नाही.

आक्रमणाचा इतिहास तसा जुना आहे. भारतीय मुस्लिमांनी पाकिस्तानची स्वप्ने बघायला सुरुवात केली, त्याच्या कितीतरी आधीपासून आसामात मुस्लिमांचा लोंढा लोटत आलेला आहे. विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासूनच केवळ आसामातच नव्हे तर शेजारच्या पश्चिम बंगालमध्ये आणि बिहारातही पूर्वेकडील मुस्लिमांनी घुसायला सुरुवात केली होती.

आसामच्या चहाच्या मळ्यात काम करण्यासाठी येणारे कष्टाळू बिहारी आणि

बंगाली मजूर एवढेच लोक इ. स. १९०० पर्यंत आसामात येत. पण १९०० पासून एकदम एक क्रांती घडून आली. पूर्व बंगालातील मुस्लिमांची लोकसंख्या वाढत होती. जमिनीवरील लोकसंख्येचा दबाव वाढत होता. आणि भुकेले लोक पोट भरण्यासाठी आता वेगळा मार्ग आणि वेगळे प्रदेश शोधू लागले होते.

आणि पूर्व बंगालच्या काही जिल्ह्यांना लागूनच आसामातील ब्रह्मपुत्रेचे सुपीक खोरे होते. मुख्य म्हणजे आसामातील यापैकी बरीचशी सुपीक जमीन नुसती पडून होती. झाले, पूर्व बंगालच्या मायमेनसिंग जिल्ह्यांतून भूमिहीन शेतकरी हळू-हळू आसामातील गोआळपारा या जिल्ह्यात घुसू लागले. तेथील रिकामी पडलेली जमीन ताब्यात घेऊन ती कसायला सुरुवात करू लागले. १९११ सालच्या आसाम सरकारच्या शिरगणतीच्या अहवालात या हालचालींचा प्रथमच उल्लेख आहे. एखाद्या प्रचंड सैन्याने शांतपणे आक्रमण करून एखादा प्रदेश ताब्यात घ्यावा, त्याप्रमाणे मायमेनसिंग जिल्ह्यातील मुस्लिम शेतकऱ्यांनी आसामातील सारा गोआळपारा जिल्हा १९०० ते १९१० च्या दरम्यान व्यापून टाकला. आणि तेव्हा-पासून सुरू झालेली ही रीघ आतापर्यंत त्याच मार्गाने चालू आहे. आसामच्या लोकसंख्येच्या इतिहासातील ही सर्वात मोठी घटना आहे. विसाव्या शतकातील पहिल्या दशकातील अवघ्या एका वर्षात या पूर्व बंगालमधून आलेल्या (इमिग्रंट) मुस्लिमांची संख्या गोआळपारा जिल्ह्यात ४९,०५९ वरून १,१८,२२३ वर गेली.

ब्रह्मपुत्रेच्या खोऱ्यातील बरीच दलदलीची जमीन तेव्हा नुसती पडून होती. त्या जमिनीला चार जमिनी म्हणतात. मायमेनसिंग जिल्ह्यातून हे मुस्लिम शेतकरी या जमिनी व्यापण्यासाठी त्या वेळी कसे येत याचे त्या काळात गोआळपारा जिल्ह्यात असलेल्या एका गृहस्थाने वर्णन केले. तो म्हणाला, "प्रचंड जमावाने हे लोक पुढे पुढे सरकत व जमिनी ताब्यात घेत. त्यामुळे स्थानिक शेतकरी व हे लोक यांच्यांत मोठ्या मारामाऱ्याही होत. शेवटी या मारामाऱ्या टाळण्यासाठी त्या जमावांच्या पुढाऱ्यांशी बोलणी करून आमच्या गावच्या सीमा ठरवून घेत असू."

"पहिल्या दशकात घुसलेले शेतकरी ही जणू त्यांच्या मागून येणाऱ्या प्रचंड सैन्याची आघाडीची पथकेच होती–" शिरगणती अहवालात म्हटले आहे–"त्यांच्या-मागून येणाऱ्या पूर्व बंगाली शेतकऱ्यांनी सबंध गोआळपारा जिल्हा जिंकला, नंतर नौगांग जिल्हा त्यांच्या आक्रमणाला बळी पडला. कामरूप जिल्ह्यातील बारपेटा तालुकाही त्यांनी व्यापला. आणि दारांग तालुक्यातही त्यांनी जम बसविला."

अवघ्या २५ वर्षांत अशा रीतीने दहा लाखांच्या वर लोकसंख्येने पूर्व बंगालातून आसामात स्थलांतर केले. "मुंग्यांच्या प्रचंड रांगेप्रमाणे आसामात त्यांची रीघ लागली होती," असे अहवालात म्हटले आहे.

ही हालचाल पुढे तशीच चालू राहिली. १९३७ ते ४५ या काळात पूर्व बंगा-

लात मुस्लिम लीगचे सादुल्लाखान यांचे मंत्रिमंडळ होते. त्यांनी या स्थलांतराला उत्तेजनच दिले. दर दहा वर्षांनी होणाऱ्या शिरगणतीत अशा तऱ्हेने मुस्लिमांची संख्या वाढू लागली. या वाढत्या मुस्लिम स्थलांतराविषयी शिरगणती अधिकारीही इशारे देऊ लागले. हे स्थलांतर थांबवले नाही तर हे लोक लवकरच आसामी भाषा आणि आसामी संस्कृतीचा नाश करतील असे इशारे देऊ लागले. उत्तरेकडे ज्याप्रमाणे गोआळपारा जिल्ह्यातून हे स्थलांतर होत होते, त्याप्रमाणे दक्षिणेतील पूर्व बंगालच्या सिल्हेट जिल्ह्यातून आसामच्या काचार जिल्ह्यातही हे स्थलांतर होऊ लागले होते.

## फाळणीनंतर

अर्थात हे स्थलांतर नैसर्गिक होते. आर्थिक कारणांमुळे घडत होते. पुढे १९४७ साली फाळणी झाली. पूर्व बंगालचे पूर्व पाकिस्तान झाले; पण स्थलांतराची ही प्रक्रिया काही थांबली नाही. पण या स्थलांतराला आता वेगळा अर्थ प्राप्त झाला होता. एका राष्ट्रातून दुसऱ्या राष्ट्रात होणारे हे स्थलांतर होते. प्रथम काही वर्षे या स्थलांतराकडे कुणाचेच लक्ष नव्हते; पण १९५१–१९६१ चा शिरगणतीचा अहवाल प्रसिद्ध झाला आणि झणझणीत अंजन घातल्याप्रमाणे ही गोष्ट एकदम ध्यानात आली. १९५१ ते १९६१ या दरम्यान आसामची मुस्लिम लोकसंख्या १९,९६,००० पासून २७,६५,००० पर्यंत वाढली होती. हेच आकडे पश्चिम बंगाल ५०,६५,००० पासून ६९,७१,००० पर्यंत आणि त्रिपुरा १,३७,००० पासून २,३०,००० पर्यंत. पाकिस्तानच्या शिरगणतीच्या अहवालाप्रमाणे याच दरम्यान पश्चिम पाकिस्तानची लोकसंख्या २३·७ टक्क्याने वाढली तर पूर्व पाकिस्तानची २०·९ टक्क्यांनी. जीवनशास्त्राच्या नियमाप्रमाणे सर्व पाकिस्तानची लोकसंख्या ज्या प्रमाणात वाढावयास हवी ती त्या प्रमाणात वाढली नाही. मग झाले काय ? ही वाढणारी लोकसंख्या भारतात आली.

आसाम काँग्रेसचे अध्यक्ष श्री. सिन्हा यांनी मला पाकिस्तानच्या शिरगणती अहवालातील काही आकडे दाखवले. या आकड्यांनुसार या अहवालातच म्हटले आहे की नैसर्गिक वाढीपेक्षा पूर्व पाकिस्तानातील लोकसंख्या १९५१–६१ या काळात १० लाखाने कमी झालेली आहे. हे दहा लाख भारतात गेलेले असून त्यांपैकी ४,१५,००० पश्चिम बंगालात, ५५,००० त्रिपुरात, २,९७,००० बिहारात आणि २,२०,००० आसामात स्थलांतरित झाले आहेत.

"इतर राज्यांत एवढे पाकिस्तानी घुसत असता आसामवरच तुमचा राग का?" असा श्री. सिन्हा यांचा रोख होता. आदल्या दिवशी श्री. श्रीमन गोस्वामीदेखील म्हणाले होते, "बंगालात साडेचार लाख पाकिस्तानी घुसले, पण त्याची कुणी दखल घेत नाही. आसामविषयी मात्र हा आरडाओरडा ?"

श्री. सिंहा, श्री. गोस्वामी आदींचे म्हणणे अगदी बरोबर असले तरी आसामची

एकूण लोकसंख्या, भौगोलिक रचना, राजकीय आणि सामाजिक परिस्थिती यांचा साकल्याने विचार करता कितपत तथ्य आहे याचा विचार करण्यापूर्वी आसामातील पाकिस्तानी आक्रमणाविषयी थोडी अधिक माहिती घेतली पाहिजे.

१९६१ च्या शिरगणतीचा अहवाल प्रसिद्ध होण्यापूर्वी पाकिस्तानी आक्रमणाची कुणकुण होतीच; पण सरकारदरबारी त्याची दाद घेतली जात नव्हती. त्यातच त्या वेळचे आसामचे एक मंत्री श्री. फकरुद्दीन अली अहमद यांनी एका ठिकाणी वार्ताहर परिषदेत सांगितले की, "आसामात पाक आक्रमण मुळीच नाही."

कलकत्त्याच्या एका इंग्रजी वृत्तपत्राने यासंबंधी गोहत्तीच्या आपल्या वार्ताहराला विचारणा केली. आणि सत्य परिस्थिती शोधून काढण्यास सांगितले. या वार्ताहराने सीमाभागांचा कसून दौरा केला. बरीच माहिती, आकडे गोळा केले आणि पाकिस्तानी आक्रमणाविषयी काही खळबळजनक लेख प्रसिद्ध केले. श्री फकरुद्दीन अहमद यांना हे प्रकरण पुढे बरेच जड गेले.

### वाऽऽरे सीमा.

पाकिस्तानी लोक आसामात कसे घुसतात आणि हे आक्रमण सहजासहजी थांबवणे कसे कठिण आहे याविषयी काही गंमतीदार माहिती या वार्ताहराने मला सांगितली. गोआळपारा आणि काचार हे दोन्ही मैदानी जिल्हे आहेत. त्यामुळे भारत–पाकिस्तान सीमारेषा या जिल्ह्यांतील अनेक खेड्यांना छेदून गेली आहे. काही काही घरे अशी आहेत की स्वयंपाकघर पाकिस्तानात आणि पुढची खोली भारतात. म्हणजे जेवायचे पाकिस्तानात आणि झोपायचे भारतात. सीमांवरील खेड्यांमध्ये बहुतांशी मुस्लिम राहत. त्यांचे नातेवाईक पाकिस्तानात. त्यामुळे जाणे येणे, पाहुणे, देवाण घेवाण सतत चालूच असे. पाकिस्तानी मुस्लिम कोण आणि भारतीय मुस्लिम कोण हे कोण कसे ओळखणार?

ब्रह्मपुत्रा नदीमध्ये असंख्य लहान लहान बेटे आहेत. गोआळपारा जिल्हा आणि पाकिस्तान यांची सीमा ब्रह्मपुत्रा नदीवरून बऱ्याच ठिकाणी ठरविली गेली आहे. या छोट्या बेटांमधील सर्व लोकवस्ती जवळ जवळ मुस्लिमांची. इकडच्या बाजूला नदी ओलांडली की पाकिस्तान अशी परिस्थिती आहे. त्यामुळे बऱ्याच जणांना आपण भारतात राहत आहोत की पाकिस्तानात, याचीही कल्पना नसते. लहान सहान बेटांवर पोलिस चौक्या वगैरे काही नसतात. त्यामुळे पोटापाण्यासाठी आलेल्या आपल्या पाकिस्तानी भाईबंदांना सीमेवरील मुस्लिम आपणांस सहज समावून घेतात.

पाकिस्तानातून आलेले हे आक्रमक भराभर आसामी भाषा शिकतात. बंगाली आणि आसामी भाषांमध्ये फार कमी फरक आहे. त्यामुळे अगदी थोड्या अवधीत ते पूर्णपणे आसामी बनून जातात. पण भाषा जरी सारख्या असल्या तरी उच्चारांत फरक आहे. तुमची मातृभाषा काय असे विचारताच ते चटकन सांगतात, "असमिया आमार मातर भाष" पण ज्याची खरोखरच आसामी ही मातृभाषा आहे तो

बेरोबर उच्चार करतो, "अशम्या आमार मातर माख." त्यावरून त्यांची खरी मातृभाषा कळून चुकते; परंतु काही दिवसांनी हे लोक उच्चारही शिकून घेतात.

पूर्व पाकिस्तानातील हे मुस्लिम किती वेगाने आणि झटपट स्वत:चे आसामीकरण करून घेतात याची मजेदार हकीकत या वार्ताहराने सांगितली. ब्रह्मपुत्रेच्या एका भारतीय बेटावर संपूर्ण पाकिस्तानी आक्रमकांची वस्ती असल्याचे कळले होते. म्हणून हा वार्ताहर एका आमदारासह त्या बेटावर गेला होता. आमदार येत आहे हे कळताच गावात बरीच साफसफाई झाली. गावात शाळाही होती. पाटयांवरची बंगाली अक्षरे पुसून आसामी अक्षरे आली. सोपे होते! कारण दोन्ही लिप्यांमध्ये फरक फारच कमी. पण त्यामुळेच त्या साऱ्या पाटया विचित्र दिसत होत्या. पुसलेल्या रेघा, नव्याने दिलेली टिंबे स्पष्ट दिसत होती. आणि शाळेत ज्याला विचारावं तो मुलगा बेधडक सांगे, "असमिया आमार मातर माष."

## फक्त चौदा रुपये

या गोष्टी १९६१–६२ पूर्वीच्या. आता सीमेवर बऱ्याच ठिकाणी पोलिस चौक्या बसविलेल्या आहेत. पण त्यामुळे परिस्थितीत विशेष फरक पडला नाही. सीमेवरील पोलिसांना मात्र बरे दिवस आले. या पोलिसांविषयी मी बऱ्याच जणांकडून तक्रारी ऐकल्या. आसामातील डाव्या कम्युनिस्ट पक्षाचे सेक्रेटरी श्री. अचिंत भट्टाचार्य यांनी तर मला सरळ सांगितले, "पाकिस्तानात जायचं आहे का? अगदी सोपं! १४ रुपये पोलिसाच्या हातावर ठेवले की, रुबाबात सीमा ओलांडायची. परत येताना पुन्हा १४ रुपये. हा सध्याचा दर आहे."

१९६२ नंतर बिमलप्रसाद चालिहा यांच्या सरकारने कडक धोरण स्वीकारले. पाकिस्तानी आक्रमकांना शोधून काढून त्यांना पाकिस्तानात परत पाठविणे सरकारने सुरू केले. आणि याच गोष्टीवर आसामात एकच हलकल्लोळ माजला. भारतीय मुस्लिमांवर अन्याय होत असल्याच्या तक्रारी होऊ लागल्या आणि पक्षा–पक्षांमध्ये या प्रश्नावर रणकंदने माजू लागली.

मुस्लिमांवर अन्याय होतो हे खरे आहे, पण त्याला कारणे आहेत. पाकिस्तानातून आलेला मुस्लिम भारतीय मुस्लिमांत सहज मिसळून जातो आणि तेही त्याला झाकून ठेवतात हे खरे आहे. त्यामुळे पोलिसांना पाकिस्तानी आक्रमक शोधून काढणे जवळ जवळ अशक्य होऊन बसते. त्यामुळे मग पोलिस कुणालाही 'चल, तू पाकिस्तानी आहेस' म्हणून धरून आणू शकतात. यातून सुटण्याचा एकच उपाय. तो म्हणजे पोलिसांचे हात ओले करणे. हा अन्याय टाळणे भारतीय मुस्लिमांच्याच हाती आहे. पाकिस्तानी मुस्लिमांना झाकून न ठेवता त्यांनी पोलिसांशी सहकार्य केले तर या गोष्टी अगदी सोप्या होतील. पण भारतीय मुस्लिमही या गोष्टीत सहकार्य करीत नाहीत ही गोष्ट सत्य आहे. आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार अनधिकृतरीत्या प्रवेश केलेल्या परदेशी व्यक्तीला कोणतीही चौकशी न करता हाकलून लावता

येते; त्यामुळे पाकिस्तानी मुस्लिम शोधून काढणे आणि त्यांना परत पाठविणे हे सारे पोलिसांच्या हाती होते. आणि पोलिसांचा जाच वाढत होता.

या पद्धतीवर बरीच टीका होऊ लागली. तक्रारी होऊ लागल्या. पोलिस एखाद्या सीमेवरील खेड्यांत जायचे आणि सर्वांना सांगायचे, "तुम्ही पाकिस्तानी आहात." ते गरीब लोक म्हणायचे, "नाही साहेब, आम्ही तर हिंदुस्थानी आहोत. गेल्या चार पिढ्या इथेच राहतो." पोलिस म्हणायचे "कशावरून ? कागदपत्र आहेत ?"

शेवटी सौदा ठरायचा आणि पोलिस खूष होऊन निघून जायचे. ज्या गावांमध्ये सौदा करण्याची ऐपत नसायची त्यांची कंबख्ती. सौद्यावर साऱ्या गोष्टी सुटायच्या. मग कुणी भारतीय असो वा पाकिस्तानी.

टीका फार वाढली, तेव्हा आसाम सरकारने नियमांत थोडा बदल केला. काही चौकशी न करता संशयित आक्रमकांना परत पाठविण्याऐवजी त्यांची चौकशी होऊ लागली. पण चौकशी करण्याचे काम पोलिसांकडेच होते. त्यामुळे पुन्हा पोलिसांचा जाच ! पुन्हा टीका ! पुन्हा नियमांत थोडा बदल झाला. पोलिसांनी चौकशी करण्याऐवजी संशयित आक्रमकांची कागदपत्रे मॅजिस्ट्रेटकडे चौकशीकरता जमू लागली. पण ही कागदपत्रे पोलिसांच्यातर्फेच जात. त्यामुळे पुन्हा जाच होऊ लागला. टीका होऊ लागली. अखेर आता अशा संशयित आक्रमकाला कोर्टापुढे आपली बाजू मांडता येते. पण याही गोष्टीवर टीका आहेच. कोणत्याही मुस्लिमाला आपले कागदपत्र सिद्ध करावे लागतात. पोलिसाने संशय घेतला की कोर्टाचे खेटे घालावे लागतात. यातही जाच आहेच.

## विविध पक्ष

यामुळे प्रत्येक मुस्लिम हा संशयित होतो. दरवेळी त्याला आपल्याजवळ आपण भारतीय असल्याचा पुरावा दाखवणारे कागदपत्र बाळगावे लागतात.

"असे करणे म्हणजे मुस्लिमांचे नागरिकत्वाचे हक्क हिरावून घेऊन त्यांना कनिष्ठ दर्जाचे नागरिक बनविण्यासारखे आहे."—अचिंत भट्टाचार्य—डावे कम्युनिस्ट.

"चाळीस चाळीस वर्षे भारतातच (आसामात) राहिलेल्या गरीब मुस्लिमांनादेखील यामुळे पोलिसांचा अत्यंत जाच सहन करावा लागतो."—सोनी पट्ट, सेक्रेटरी, आसाम राज्य कम्युनिस्ट पक्ष.

"हा निव्वळ छळ आहे. आक्रमण ही काही फार मोठी समस्या आसामात उरलेली नाही. असा जातीयवाद आसामात आणणे राज्याच्याच हिताच्या दृष्टीचे नाही."—विश्व गोस्वामी, सेक्रेटरी, आसाम राज्य प्रजा समाजवादी पक्ष.

"मुस्लिमांस अशी वागणूक मिळत असेल, तर आपल्या देशाच्या धर्मातीततेचे काय ?"—धरणीधर दास, सेक्रेटरी, आसाम राज्य सोशलिस्ट फोरम.

"भारतीय मुस्लिमांना अशी वागणूक देऊन आपण स्वतःचेच नुकसान करून घेत आहोत—" शरत्‌चंद्र सिन्हा, अध्यक्ष, आसाम काँग्रेस.

"आक्रमकांना परत पाठविण्याचे काम फार ढिलेपणाने चालू आहे. त्यांना चांगले पैसे देऊन आरामात संथपणे रेल्वेने पाकिस्तानात एखाद्या माहेरवाशिणीसारखी बोळवण करून पाठविले जाते. अधिक जारीचे आणि कडक उपाय योजले पाहिजेत—" देविदास आपटे, संघटन मंत्री, आसाम प्रदेश जनसंघ.

परंतु या पद्धतीविषयी नाराजी व्यक्त करणाऱ्या कोणत्याही राजकीय पुढाऱ्याने माझ्या काही शंकांचे समाधान केले नाही. भारतीय मुस्लिमांनी या बाबतीत पोलिसांशी सहकार्य करण्याचे ठरविले तर हा सारा प्रश्न चुटकीसरशी सुटण्यासारखा आहे. आक्रमक पाकिस्तान्यांना आपल्या घरात किंवा गावात आश्रय न देता त्यांना सरळ पोलिसांच्या हवाली केले तर त्यांचा सारा छळ थांबेल. पोलिसांना कुणाला तरी पकडायचेच असते. आक्रमकांना लपवून ठेवले तर ते साऱ्या खड्यालाच जबाबदार धरतात. या भारतीय मुस्लिमांनी सहकार्य दिल्याशिवाय पोलिसांना आक्रमक सापडणे अशक्य आहे.

**मग हे भारतीय मुस्लिम पोलिसांना सहकार्य देतात काय? त्यांनी ते द्यावे म्हणून कुणा भारतीय मुस्लिम पुढाऱ्याने प्रयत्न केला आहे काय? तशी चळवळ केली आहे काय? निदानपक्षी तसे आवाहन तरी आपल्या मुस्लिम-बांधवांना केले आहे काय? त्यांचा कैवार घेणाऱ्या इतर राजकीय पुढाऱ्यांनी तरी या दिशेने काही प्रयत्न केले आहेत काय?**

मी खूप चौकशी केली, पण माझी निराशा झाली. अशा तऱ्हेची भारतीय मुस्लिमांची संघटना किंवा चळवळ असल्याचे मला कुणी सांगितले नाही. तसे आवाहनही कुणा मुस्लिम पुढाऱ्याने केलेले मी ऐकले नाही की इतर राजकीय पुढाऱ्यांनी मुस्लिमांमध्ये शिरून त्या दिशेने मोठे जोराचे प्रयत्न केलेले आहेत असेही दिसले नाही. यासंबंधी मी प्रश्न विचारले, तेव्हा कशीबशी मोघम उत्तरे मिळाली; किंवा चतुराईने प्रश्नांना बगल देण्यात आली.

असे का? एवढ्या मोठ्या गंभीर प्रश्नाबद्दल ही अनास्था का? केवळ सरकारला शिव्या देण्याऐवजी भारतीय मुस्लिमांच्या तक्रारी दूर करण्यासाठी, हे राजकीय पक्ष स्वतःहून त्यांना सांगण्यासाठी शहाणपण शिकविण्यासाठी का धावून गेले नाहीत? एवढे दुर्लक्ष का? हा गलथानपणा, की हे हेतुपूर्वक केलेले दुर्लक्ष?

**वस्तुस्थिती ही आहे की आसामातील कोणताही राजकीय पक्ष आपल्या मुस्लिम मतदारांना दुखवायला तयार नाही. प्रत्येक मतदारसंघात मुस्लिम समाज आता एवढ्या मोठ्या प्रमाणात तयार झाला आहे की मुस्लिम मतांच्या पाठिंब्याशिवाय उमेदवारांना निवडणुकी जिंकणे कठिण होऊन बसले आहे.** मुस्लिमांना जो दुखावेल तो

साधारणत: आपटी खातोच; त्यामुळे मुस्लिमांनाच त्यांच्या हिताच्या, शहाणपणाच्या चार गोष्टी सांगण्याचे धाडस कुणी राजकीय पक्ष करीत नाही. काँग्रेसमधील अधिकारारूढ पक्षाने आक्रमकांना परत पाठविण्याचे जारीचे धोरण अवलंबिल्याने मस्लिम नाराज झाले. विरोधी पक्षांनी त्याचा फायदा घेतला आणि त्यामुळेच या निवडणुकीत आसाम राज्यात काँग्रेसला विधानसभेच्या १२६ पैकी अवघ्या ७२ जागा मिळाल्या. मागील १०५ च्या विधानसभेत काँग्रेसच्या ७९ जागा होत्या. या घसरगुंडीला कारण काँग्रेसचे हेच धोरण, अशी काँग्रेसच्या एका गटाची तक्रार आहे. आणि म्हणून या धोरणात अधिक सुधारणा हवी अशी त्यांची मागणी आहे.

काँग्रेसमधील हा गट म्हणा किंवा इतर राजकीय पक्ष यांची आक्रमकांना परत पाठविण्याबाबतची अशी प्रतिक्रिया आहे. त्या मागचे त्यांचे हेतू असे आहेत. पण एकूण पाकिस्तानी आक्रमणाबाबतचीच त्यांची भूमिका काय आहे? आपल्या धोरणाच्या संभाव्य परिणामांची त्यांना कितपत जाणीव आहे? हे सत्तेच्या स्पर्धेपुढे आसाम राज्याच्या आणि साऱ्या देशाच्या हिताची ते कितपत चिंता वाहतात याचा मागोवा घेतला तर प्रश्नाचा एकेक धागा उलगडू लागतो. परिस्थिती अधिक गंभीर आहे असे वाटू लागते. आणि प्रांतांतही पाकिस्तानी आक्रमण चालू असता आसामच्याच बाबतीत एवढी जादा काळजी वाहण्याचे कारण काय हे कळू लागते.

आणि मग या साऱ्या गोष्टींचा विचार केल्यावर साऱ्या पुढाऱ्यांशी व पत्रकारांशी या प्रश्नावर प्रदीर्घ चर्चा केल्यावर सुरुवातीला आसाम काँग्रेसचे माजी अध्यक्ष श्री. श्रीमान गोस्वामी यांनी जो आवेग व्यक्त केला होता त्याचा अर्थ ध्यानी येतो. आणि आक्रमणाच्या प्रश्नावर हे लोक एवढे हळुवार का आहेत हे कोडे हळूहळू उलगडू लागते.

(अपूर्ण)


| | |
|---|---|
| परसूच्या पशुकथा | वसंत सबनीस |
| सहा साहसे | दा. सी. देसाई |

मूल्य प्रत्येकी दोन रुपये

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २.

# डेथ! बी नॉट प्रॉउड!!

आनंद रामचंद्र फुले

दिवा मालवून कॉटवर येऊन पडलो खरा ! दरम्यान निदान तासाच्या अल्याड-पल्याडचा वेळ गेला, पण झोप येण्याचं नाव नाही. तसं माझं व झोपेचं मोठंच सख्य ! बिछान्याला पाठ टेकायचाच अवकाश की झोपेचा अंमल सुरू. आराधना वगैरे करून प्रसन्न करण्याची बातच नको.

पण आज काही केल्या झोप येत नव्हती. कड पालटून प्रयत्न केला. अकरा एके अकरापासून पाढे म्हणून पाहिले. अडीचकीची वेळ आली. पण झोप नाही. सर्व बुद्धया प्रयत्न फसले. शेवटी नाद सोडला. अंधारात झोपेच्या कलानंच घ्यायचं ठरवलं. कदाचित् सकाळी मधूनं माझी झोपमोड केली म्हणून निद्रादेवीचा हा असा अव्हेर असेल ! नेहमीची उठायची वेळ पावणेसात–सात ! पाचला दहा मिनिटं कमी असतानाच मधूनं मला जागविलं होतं. तब्बल दोन तास आधी. आजचा दिवस नेहमीपेक्षा दोन तास आधीच उजाडला होता. माझाच नाही. अख्या कॉलेजच्या होस्टेलर्सचा.

माया राव नावाच्या एका ट्रेनी नर्सनं झोपेच्या गोळ्या खाऊन आत्महत्या केली होती.

अगदी कालच्या रात्रीपर्यन्त माया राव ही इतर शेकडो नर्सेसपैकी एक होती. तेवढंच तिला महत्त्व होतं. म्हणजे एक नर्स म्हणून सर्वसाधारणपणे जेवढं असतं तेवढंच. तिचं नावसुद्धा तिला ओळखणाऱ्या फार तर पाच-पन्नास व्यक्तींखेरीज कुणालाही ठाऊक नव्हतं. रात्री एक वाजता ते सर्वतोमुखी झालं. ती एक चर्चेचा विषय. ज्वलंत स्वरूपाची चर्चा.

हॉस्पिटलच्या कंपाऊंडजवळच्या अंधेऱ्या आवारात एका झाडाखाली कॉलेजातील एका स्थानिक महशूर श्रीमंताच्या दिग्विजयी चिरंजीवांसमवेत ही माया राव रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास जवळजवळ विवस्त्र अवस्थेत पाळतीवरच्या पोलिसाकरवी पकडली गेली. अजून एक मुलगी तिथं होती, पण ती मात्र शिताफीने सटकली होती. सापडले हे दोघे एका मोठ्या पाईपमध्ये. जवळपास पाईप लाईन खोदलेली होती. अनेक पाईप्स तिथं होते. पैकी एकाचा आश्रय ह्या दोघांनी घेतला

अगदी कालच्या रात्रीपर्यंत
माया राव ही इतर शेकडो नर्सेसपैकी एक होती.
तेवढंच तिचं महत्त्व होतं.
पण आज ...?

होता. कसं न कळे; पण पोलिसाला सुगावा लागला. पाळतीवर होता म्हणून किंवा अचानकपणं पोलिसाला सुगावा लागला. त्यानं आपली कामगिरी बजाविली होती. एकदम गाजावाजा झाला. 'विश्वासार्ह,' 'अधिकृत' किंवा 'आतील गोटातून' वर्गवारी व्हावी अशा ह्या प्रकरणाच्या अनेक आवृत्त्या चवाठ्यावर आल्या. तिन्हीही होस्टेल्स् विद्यार्थ्यांनी अक्षरशः जागविली. मनाला सुचेल, तोंडावाटे येईल त्याचा परिपाक होत होता. दहा-पंधरा मिनिटांआधी माया राव हे नावसुद्धा न ऐकलेले. 'माया राव' ह्या विषयावरचे आपले संशोधनपर निबंधच जणू वाचून दाखवीत होते. कॉलेजात दादागिरी व लफडेगिरीबद्दल मशहूर असलेल्या ह्या विद्यार्थ्यांसोबत त्याची स्वतःची सख्खी बहीणसुद्धा कुठं कोणाला दिसली की दुसऱ्या दिवशी अख्ख्या कॉलेजच्या परिसरात चर्चेसाठी नानाविध गोटांतून अगदी 'चिडी-चूप.' मासिकांतसुद्धा असणं संभाव्य नाही, असा उपसा होणार एवढी कीर्ती ज्याची; त्याच्यासमवेत. रात्री अकरा-बाराचा सुमार. स्थळ : कंपाउंडचा कुप्रसिद्ध अंधेरा भाग. पाईपशी सुरक्षितता. प्रासंगिक म्हणजे पोलिसाने जवळजवळ (?—एक विवाद्य मुद्दा) विवस्त्र स्थितीत ह्या माया रावला पकडले, ह्यापरता दुसरा चर्विष्ट विषय तो कसा असू शकतो? जवळजवळ दोन वाजता कंठशोष सुस्तावला? काही बोलून बोलून—इतर ऐकून ऐकून थकले भागलेले जीव बिछान्यावर आडवे झाले. सर्वांत मोठे प्रश्नचिन्ह होते, ही शिताफीने सटकलेली तरुणी कोण? अनेक नावं चर्चेला येत होती. पण निश्चितपणं कोणाचंच नाव ठरविलं जाऊ शकत नव्हतं. साराच घोळ होता.


पुनः दोन तासांच्या काळात अख्खे होस्टेलर्स जागे. झोपेच्या गोळ्या खाऊन माया रावने आत्महत्या केली होती.

रात्रीच्या उत्साहाची फसफस विरून गेली होती. साऱ्या वातावरणात सुतकी अवकळा होती. रात्री नुसता ओसंडणाऱ्या भर उत्साहाच्या तारेत जे छातीठोकपणे (छाती स्वतःची) ती तशीच असल्याची ग्वाही देत होते तेच ती तशी नसावी असं म्हणत होते. एरव्ही तिनं आत्महत्या केली नसती. कुण्या तरबेज मैत्रिणीच्या

शिकवणीच्या प्रभावाखाली म्हणा किंवा वयाच्या हिरव्या अंमलाखाली म्हणा ह्या असल्याच भुलावणीनं एक फसवा क्षण जन्माला आला होता. त्यानं तिला त्या तरुस्थळी नेलं होतं खरं. पण नशिबाची साथ मिळणार नव्हती. दैव तिच्यावर उलटलं. ती पकडली गेली. कदाचित् पापाच्या वर्गात मोडणारं असेल, पण तिच्या मनाला, देहाला प्रणयाच्या भावनेनं संतृप्त करण्याआधीच घाला घातला गेला होता. प्रणयाच्या भावनेनं कदाचित् पापाच्या गर्तेत कडेलोट व्हायचा तो आता नामुष्कीच्या गर्तेत झाला होता. ज्या मनाच्या धैर्यानं ती प्रणयविव्हल होऊन स्वतःच्या कडेलोटास उद्युक्त झाली होती. आता त्याच मनोनिग्रहानं तिनं मृत्यूच्या खाईत स्वतःच्या जीविताचा कडेलोट केला होता. कदाचित् पाऊल वाकडं पडलं असेल, पण म्हणून तिला नामुष्कीचं जिणं नको होतं. एखाद्या (जिवावर उठल्याची जाणीव नसलेल्या) जीवश्चकंठश्च मैत्रिणीच्या शब्दांत आल्यामुळं किंवा गोड आश्वासनांवर विसंबून राहणाऱ्या स्त्रीसुलभ भावुकतेमुळे किंवा भाबडेपणामुळे तिची माणसाची पारख चुकली होती हे निश्चित ! पण तिनं चुकीची भरपाई केली होती. सतरा-अठरा वर्षांची एक जीवितयात्रा अशा रीतीनं संपली होती.

आजच्या अख्ख्या दिवसाचा सूर, एक प्रकारच्या उदासीनतेची भावना जपत होता.

स्त्रीचं मन अनाकलनीयच ! जगाच्या अन्तापर्यंत ते तसंच राहणार ! एखादी स्त्री वयाच्या कोणत्याही क्षणी कोणावर भाळेल हे सांगणं प्रत्यक्ष तिच्या विधात्यालाही शक्य होणार नाही. एखाद्या व्यक्तीच्या एखाद्या गुणावर किंवा किमान रूपावर ती भाळली हे तर्कसंगत वाटतं; पण अनेकदा प्रत्यक्षात वेगळंच दिसतं. कॉलेजातच बघावं तर ना काही रूप—ना गुण—ना वैशिष्ट्य अशा विद्यार्थ्यांबरोबर रूपगुणसंपन्न तरुण मुली वावरत असतात. महिन्या—चार महिन्यांकाठी त्यांची पात्रं बदलत असतात. मूळ प्रश्न हा की मुलींना मोह पडावा असं यांच्यात काय असतं ? एखाद्या मुलाची तशी कीर्ती असतानासुद्धा एकापाठोपाठ एक अशा मुली त्याच्या सहवासात सातत्यानं येतातच कशा ? कशाचीही पर्वा न करता स्वतःचा कडेलोट करण्यास प्रवृत्त व्हावं असं ह्या मुलांत काय असतं ? की स्वतःच्याच वयाच्या अनावर भावनांना आलेला तो एक कढ असतो. प्रकृतिनिष्ठ उद्रेक असतो. त्याला वय—काळ—व्यक्ती ह्यांच्याशी काहीच कर्तव्य नसतं. ह्या बिचाऱ्या माया रावचंच बघाना! वय असेल फार तर सतरा—अठरा, रूप—कुणास ठाऊक, पोस्ट मॉर्टेम झाल्यावर कलेवर बघावयास मिळालं होतं खरं, पण त्या कलेवराच्या भयानक रंगसंगतीमुळं मिनिटभरसुद्धा ते पाहणं झालं नव्हतं. ह्या कोवळ्या मुलीचा इतक्या गाजलेल्या मुलाशी संबंध आलाच कसा ? बरं, आला तर आला ! पण नाव कळताच ही सावध कशी झाली नाही ? अख्ख्या कॉलेजभर त्याचा बोलबोला असताना, हिला हिच्या कुणी मैत्रिणीनं सावध कसं केलं नाही ? की हे सारं कळूनसवरूनसुद्धा तिचं पाऊल तसूभरसुद्धा मागं झालं नाही ? पापाच्या गर्तेतल्या कडेलोटालासुद्धा ते



तयार झालं ? कसं झालं ? कोणत्या सुप्त शक्तीनं विजय मिळविला ? त्याच्या आश्वासनांमुळं तिच्या मनात जागलेल्या घरकुलाच्या हिरव्या भावनेनं की तारुण्याच्या पहिल्या अनावर प्रहरात वावरणाऱ्या भावनेनं ? कोणत्या अनामिक ओढीनं ती त्याच्या मागोमाग चकव्यानं बांधल्यागत जावं तशी गेली ? त्या कुप्रसिद्ध अंधेऱ्या भागाकडं जाताना तिचं मन थरथरलं नसेल ? पाइपाची सुरक्षितता, पण एवीतेवी उघड्यावरच ती कशी तयार झाली ? पहिलीच वेळ असताना ? पहिली ? पहिलीच ! नाही तर आत्महत्येचा मार्ग कशाला पत्करला असता ? त्या भागाशी अशा–प्रकारांशी–नातं जडलेल्या परिसरात का कमी आहेत ? चांगली नामावळी जाहीर आहे ! कोणत्या संमोहनाच्या प्रभावाखाली ती वावरत होती ? तिथं जाण्यापासून तर जीवितयात्रेचा शेवट करण्यापर्यंत कोणत्या गोष्टीच्या अंमलाखाली ती वावरत होती ?

" शाम, तुम्ही मेडिकलच्या विद्यार्थ्यांना तत्त्वज्ञान आणि काव्य हे शिकवायलाच पाहिजे ", माझा कविमित्र नेहमी म्हणायचा–" पुष्कळ वेळा प्रत्यक्ष पतीला विश्वासात घेता येत नाही अशा वेळी डॉक्टरांजवळ मात्र मन मोकळं करू शकता येतं इतकी नाजूक स्थिती निर्माण होते. पण विश्वासानं सारं सांगितलं गेलेलं पचविण्याचं सामर्थ्य डॉक्टरमध्ये नसलं तर ! ......प्रसंगी तो परिस्थितीचा फायदा घेण्यास उद्युक्त होईल. डॉक्टरला नैतिक चारित्र्य हे पाहिजेच पाहिजे ! तरच त्याच्यावर विश्वास ठेवता येईल ! एरवी नाही !

तुझ्यावरोबरीचे हे विद्यार्थी पाहिले–ऐकले म्हणजे मन शहारून येते. सदाच वखवखलेले. एखादी तरुणी फितविणे हाच पुरुषार्थ. उद्या हेच समाजात प्रतिष्ठित डॉक्टर म्हणून वावरणार. ह्यांच्यावर विश्वास कसा ठेवता येईल? आईबहिणीची प्रतिष्ठा जपण्यासाठी लागणाऱ्या चारित्र्याचा ह्यांच्यावर विश्वास ठेवायचा तो कसा?

मला अजूनही एकच प्रश्न तुम्हा मेडिकलच्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत अस्वस्थ करतो. इतरांचं मी समजू शकतो. शरीर त्यांना कल्पनेतून–वाचनातून–परावर्तित अनुभवांतूनच कळू शकतं–कळलेलं असतं. पण तुमची गोष्ट तशी नसते.

शरीराचा तुम्ही अभ्यास केलेला असतो. ते पाहिलेलं असतं. अनेकदा नानाविध रूपांत, स्थितीत पाहिलेलं असतं. मनाला चटका लावणाऱ्या रूपाबरोबरच ओंगळ; किळस आणणारं; मन शहारून येणारं; नानाविध रोगांनी ग्रासलेलं–पछाडलेलं–सडविलेलं–कुजविलेलं शरीरसुद्धा तुम्ही पाहिलेलं असतं. पेटत्या क्षणांच्या ज्वालाग्राही झेपेचा शेवट किती विलक्षण–किती भयानक होऊ शकतो, हे तुम्हांला माहीत असतं. त्याचं स्वरूप नुसत्या कल्पनेनं जाणवणार नाही एवढं अनाकलनीय असतं म्हणून इतर अज्ञानात क्षणिक सुखाचे भागीदार असतात. पण तुम्ही? तुम्हांलासुद्धा शरीराचा तेवढा मोह का पडावा? तुम्हीसुद्धा त्या दाहकतेत का होरपळावं? एका क्षणाची परिणती किती कल्पनातीत भयानक होऊ शकते ह्याची तुम्हांला जाणीव असतानासुद्धा तुमच्यांत व इतरांत फरक का पडत नाही? ज्या शरीराच्या गंधाने इतरेजन वेडेपिसे होतात–परिणामांची पर्वा न करता त्याचा पाठपुरावा करीत जातात, त्या शरीरानं तुम्हांलाही तेवढंच का मारावं? म्हणून वाटतं की तुम्हांला शरीराचं मनच कळलेलं नसतं. म्हणून काव्य व तत्त्वज्ञान हे दोन विषय शिकवायलाच पाहिजेत म्हणजे सर्वार्थानं शरीर कळेल. कुणाचा विश्वास जपण्यासाठी लागणारं चारित्र्य उभारता येईल. विश्वस्त म्हणून पात्रता मिळविता येईल."

काव्य व तत्त्वज्ञानामुळं होणारी ही संभाव्य जडणघडण विवाद्य स्वरूपाचीच आहे. पण भूमिका मान्य व्हायला हरकत नाही.

मधू म्हणतो–"ही कविकल्पना आहे. काव्य–तत्त्वज्ञानाच्या संस्कारांनी मन प्रभावीत होईल, पण शरीर हे निसर्गाचं रूप. जिथं मनाचा संबंध तिथं संस्कारांचा प्रभाव–अभाव. निसर्गावर ह्या गोष्टींची मात होऊ शकत नाही. एका मर्यादेबाहेर जाचक झालेलं संस्कारांचं बंधन निसर्ग झुगारून देईल."

मधूच्या बोलण्यातसुद्धा तथ्य असतं. तो म्हणतो की भुकेलेला मनुष्य एका विशिष्ट मर्यादेपर्यंतच भुकेच्या कळा सोसणार. नंतर तो भल्याबुऱ्याचा, पाप-पुण्याचा विचार न करता भूक शमवील. जी गोष्ट भुकेची तीच झोपेची अन् तीच शरीराची! नैसर्गिक–अनैसर्गिक हे भेद संस्कारांचे. निसर्ग आपली कामगिरी ही बजावणारच,

दाराच्या लॅचचा आवाज. म्हणजे मधू सिनेमाहून परतला तर...खोलीतला लाईट लागतो. बंद डोळ्यांना प्रकाश जाणवतो. पापण्या मिटलेल्या असल्या तरी त्याची चुळबूळ मधूनं हेरलेली असावी.

" ...अजून जागाच का ?..."

" हं !"

" काय सुंदर पिक्चर होता रे ! यू ऑट टू हॅव् सीन इट् ! दुर्दैवानं आजचा शेवटचाच दिवस होता. नाही तर उद्या तुला जबरदस्तीनं नेलं असतं."

'आय् बॉट अ डॅडी' ह्या चित्रपटाविषयी मधू बोलत असतो. पिक्चरविषयीची त्याची क्रेझ विलक्षणच आहे. स्वतः पाहतो मग इतरांना सांगतो, बघू नका. पैसे वाया जातील. क्वचित् हे असं होतं. म्हणजे पिक्चर खरोखरीच चांगला असला पाहिजे.

" लेटेस्ट न्यूज् माहीत आहे ?" क्षणभर थांबून मधू म्हणतो... " केळेवाली आज पम्याच्या रूमवर (सार्वजनिक) मुक्कामाला आहे !"

कॉलेजच्या मेन गेटवर बसणारी केळेवाली. केळ्याची विक्री कधीमधी व नाममात्र स्वरूपांत करणाऱ्या ह्या बाईचं महत्त्व असं होतं. माया रावच्या दारुण शोकान्तिकेनं भारावून जाऊन हळहळणाऱ्या पम्याच्या खोलीत आजच केळेवाली सार्वजनिक मुक्कामाला. त्याचं हळहळणं जेवढं प्रामाणिक, खरं, तेवढंच हेसुद्धा. तेवढंच प्रामाणिक–खरं ! सत्य काय ?

देवदासच्या शोकान्तिकेनं सर्वांनाच वाईट वाटतं. दारू पिणाऱ्यांनासुद्धा तेवढंच. पण म्हणून दारू सुटू शकत नाही.

वाईट वाटणं वेगळंच ! त्याचा दारू सुटण्याशी काहीही संबंध नाही. वास्तविक पाहता तो जोडलाच जाऊ नये.

माया रावच्या आत्महत्येमुळं भारावून पम्याचं हळहळणं ही वस्तुस्थिती सत्य. पण म्हणून रात्री केळेवालीबरोबर. हीसुद्धा वस्तुस्थितीच. सत्य. पण दोहोंची गल्लत

स्वादिष्ट मिठाईसाठी
आम जनतेची निवड

**शर्मा स्वीट मार्ट**

दत्त मंदिराशेजारी,
मंडई रस्ता, पुणे २.

होऊ नये. जिथं शोकान्तिकेचा जनक—प्रत्यक्ष मृत्यू— ढवळाढवळ करीत नाही, तिथं मानवी संस्कारांची—प्रयत्नांची काय कथा ?

मधू नेहमी स्वतःच्या अशा वागण्याचं असंच समर्थन करतो. नेचर इज् इन-डॉमिनेबल. पम्याच्या रूमवरील तिच्या मुक्कामाबद्दल मधूला असंच समजलेलं असणार. म्हणजे हाही विसावा शोधून... 'मूर्खपणा केला ! आत्महत्या करण्यासारखं काहीही झालं नव्हतं. केस कोर्टात स्टॅन्डच होत नाही. पोलिसाला 'गप्प' बसवतील नाहीतर दूर खेडेगावात बदली करतील असा मानला नाही तर. अन् आता केसच होणार नाही. स्वतःच्या मूर्ख-पणानं गेली.'

अख्ख्या दिवसभराच्या सुतकी वातावरणाला मात्र मधूला आपलासा करता आला नव्हता. माया रावच्या आत्महत्येविषयीची त्याची प्रतिक्रिया अपेक्षेप्रमाणं तऱ्हेवाईक होती. पण ती इतरांच्या दृष्टीनं ! त्याची ती प्रामाणिक प्रतिक्रियाच होती. निदान तो इतरांसारखा दांभिक नव्हता. केळेवालीकडे मुक्कामाला जाऊन आला. ते लपविलं नाही. अगदी खुल्लमखुल्लं सांगितलं.

खोलीतला दिवा मालवून पठ्ठा झोपीसुद्धा गेला. चक्क घोरतोय.

अन् मी मात्र माझी झोप हरवून बसलो आहे. ह्या अंधारात आगापिछा—ठावठिकाणा काहीही न जाणवणाऱ्या कशाचा तरी उगाच शोध घेतोय ! सापडत नाही म्हणून शोक करतोय ! ! ●



सर्वंकष अन् संपूर्ण विनाश,
त्यात दयामाया बिलकुल नाही !
जे जे म्हणून काही जुने आहे,
जीर्णशीर्ण आहे,
ते आता
आमच्या घणाघाती हल्ल्यापुढं
कोसळणार आहे,
कोसळलंच पाहिजे !
या पडझडीतूनच आम्हांला
नवी मंदिरं
उभारावयाची आहेत.
होय, संपूर्णपणे नवी.
जुन्या परंपरेला कायमचा
छेद देणारी.
इतिहासाला एक धक्का
दिलाच पाहिजे.
मीच तो देणार आहे.

## ही सिंहगर्जना कोणाची ? . .

६ मे १९६७



वयाच्या नवव्या वर्षी
त्यानं सांगितलं,
‘ पुढं काय करायचंय
ते मला पक्कं माहीत आहे.
माझी वाट मला स्पष्ट दिसतीय.’
व्होल्गाच्या तीरावर
ताठ मानेनं उभा राहून
हा हाडाचा क्रांतिकारक
गर्जत होता—
*‘ ऐक भविष्याला ! भव्य भीषणाला ’*


विसाव्या शतकातील
एक महान स्वप्न
एक भीषण सत्य

# व्होल्गा

# जेव्हा लाल होते

रशियाच्या पाऊणशे
वर्षांच्या इतिहासातील
काही रक्तरंजित पाने

'माणूस' मध्ये अगदी लवकरच
क्रमशः प्रसिद्ध होत आहेत.




## अभिरुची

**फेब्रुवारी १९६७**

**संपादक पु. अ. चित्रे : विमल चित्रे**

अश्लीलतेविषयी अनेकवार चर्वितचर्वण होऊनही अजून 'वादे वादे जायते कण्ठशोषः' अशीच केवळ स्थिती आहे. आपल्याला इष्ट वाटणाऱ्या भूमिकेचे अभिनिवेशाने प्रतिपादन करण्याच्या भरात विद्वानांचे लक्ष त्यातील एकांगीपणाकडे जातच नाही. पूर्णतया पूर्वग्रहरहित दृष्टीने शास्त्रीय भूमिकेतून, वास्तवाच्या बैठकीवरून या प्रश्नाचा मूलगामी विचार होणे आवश्यक आहे. अश्लीलता म्हणजे नेमके काय ते केवळ वाङ्मयाचे एक स्वरूप (Form) आहे की तो एक दोष आहे; दोष असल्यास त्यातील दोषास्पदता कोणती, ती नाहीशी करण्यासाठी कोणते निर्बन्ध आवश्यक आहेत. या सर्व गोष्टींची निर्भय खुलासेवार चर्चा व्हावयास हवी. वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून या प्रश्नाकडे पाहावयास हवे. 'अभिरुची'ने तशा प्रयत्नातूनच हा विशेषांक काढला आहे. अश्लीलतेच्या व्याख्येपासून तो अश्लीलतेविषयी असणाऱ्या कायद्यापर्यंत सर्व मुद्द्यांची विस्तारपूर्वक चर्चा या अंकात आढळावी ही अपेक्षा होती.

'अश्लीलतेची व्याख्या' हाच एका विस्तृत प्रबंधाचा विषय होण्याची शक्यता आहे. 'अश्लील म्हणजे काय?' हे वाक्य मुखपृष्ठावर घालून (त्यातही मलपृष्ठावरील शृंगारोन्माद दाखविणाऱ्या शिल्पाकृतीखाली हे वाक्य लिहून) अश्लीलतेच्या व्याख्येची काटेकोर अव्याप्ति – अतिव्याप्तिरहित चर्चा

# एका महत्त्वाच्या विषयाच्या मुळाशी जाण्याचा प्रयत्न

अंकात शोधण्याची अपेक्षा निर्माण केली गेली आहे. परंतु अश्लीलतेच्या व्याख्येची लक्ष्यवेधी चर्चा येथे सापडत नाही. 'अश्लीलता, मानसशास्त्र आणि शिक्षण' या हर्बर्ट रीडच्या भाषांतरित लेखात "कामजीवनाचे वाचकाला उद्दीपित करील असे हुबेहूब आणि मनोवेधक वर्णन म्हणजे अश्लीलता," अशी अश्लीलतेची व्याख्या जाताजाता करण्यात आली आहे. आणि पुढे स्पष्टीकरण दिले आहे–"यात हुबेहूब मनोवेधक (Graphic) या शब्दाला फार महत्त्व आहे. वाङ्मय किंवा शिल्पादी कला (Plastic arts) यात इच्छित परिणाम प्रतिमांच्या साहाय्याने साधलेला असतो. 'गलिच्छ चित्र' (Filthy picture) या शब्दाच्या साहाय्याने अगर प्रत्यक्ष पुढे ठेवून उभे केलेले असते. कामवासना अस्पष्टपणे जागृत करीत असल्यामुळे मोठ्या प्रमाणात कला आणि वाङ्मय कामुक, शृंगारिक (Erotic) ठरते; परंतु त्यामागील हेतू अश्लीलता निर्मावी हा नसतो, ना त्याचा परिणाम अश्लील ठरत." येथे सर्वसामान्य कला आणि वाङ्मय यांतील साधारण शृंगारिकता आणि अश्लीलता यांत फरक करण्यासाठी जास्त काटेकोर बनण्याचा प्रयत्न केला आहे. पण असे करतानाच ती व्याख्या काटेकोरपणापासून दूर गेली आहे; कारण पुढे लगेच म्हटले आहे :

"अश्लीलतेमध्ये दृश्य किंवा शब्दांकित प्रतिमा लैंगिक वासना नि प्रवृत्ती यांना उत्तेजक नि प्रेरक ठरतात. या वासना सामान्य माणसांमध्ये सुप्त, परंतु केव्हाही जागृत होतील अशा अवस्थेमध्ये असतात. कितीतरी अश्लील प्रतिमा इतक्या ओबडधोबड नि अकलात्मक असतात की त्यांचा काही परिणाम होत असेल असे वाटत नाही." नीट निरीक्षण केल्यास त्यांतील वदतोव्याघात सहज जाणवेल. 'कामजीवनाचे वाचकाला उद्दीपित करील असे चित्रण' म्हणजे अश्लीलता ही व्याख्या स्वतःच सांगितल्यामुळे जे वाचकाला उद्दीपित करीत नाही असे कामचित्रण अश्लील नाही, असे म्हणावे लागते. मग पुन्हा "कितीतरी अश्लील प्रतिमा इतक्या ओबडधोबड नि अकलात्मक असतात की त्यांचा काही परिणाम होत नाही," असे कसे म्हणता येईल ? ज्यांचा परिणाम होत नाही, ज्या प्रतिमा वाचकाला उद्दीपित करू शकत नाहीत, त्या स्वकृत व्याख्येनुसारच अश्लील ठरू शकतच नाहीत. ज्या अर्थी त्या वाचकावर परिणाम करीत नसूनही त्यांना अश्लील म्हणावेसे वाटते, त्या अर्थी अश्लीलतेचे गमक काहीतरी निराळे असले पाहिजे; अर्थातच, हर्बर्ट रीडने जाता-जाता केलेली अश्लीलतेची व्याख्या आपण परिपूर्ण मानू शकत नाही; किंबहुना

अश्लीलतेची व्याख्या अशी 'जाताजाता' करताच यणार नाही. ज्यावर पुढले सर्व विवेचन आधारावयाचे ती व्याख्या अवधानपूर्वक काटेकोरपणानेच केली पाहिजे.

## व्याख्येपेक्षा परिणामावर भर

'वाङमय आणि अश्लीलता' या लेखात श्री. रा. भा. पाटणकर म्हणतात, "वाङ्मय अश्लील आहे की नाही हे ठरविण्यासाठी त्यात लैंगिक गोष्टींचा उल्लेख, वर्णन आहे की नाही हे बघणे पुरेसे नाही. त्यांना एकूण जीवनपटावर योग्य स्थान दिले आहे की नाही हे पाहणे जरूर आहे. खरे अश्लील वाङमय लैंगिकतेला फार लहान चौकटीत बसविते; एकूण जीवनापासून ते सुटे केलेले असते." येथेही अश्लीलता कशी आणि कुठे शोधावी याच्या गप्पा मारताना, अश्लीलतेची शास्त्रीय व्याख्या करण्याचे खुबीने टाळले आहे. 'जीवनपटावर योग्य स्थान' म्हणजे नेमके कोणते स्थान ? ते कुणी आणि कसे ठरवायचे ? याची काही टक्केवारी उपलब्ध आहे काय ? पाटणकरच पुढे म्हणतात—"अनेक हिंदी चित्रपटांत नायकनायिकांच्या प्रेमावरच लक्ष केंद्रित केलेले असते...खरी अश्लीलता जीवनाच्या अशा Simplified चित्रणातून मिळते. जेथे दैनंदिन जीवनाचा संबंध सुटतो तेथे आदर्शवादी कला मिळते; आणि तेथेच अश्लीलताही सापडण्याची शक्यता आहे. लैंगिकतेला सबंध जीवनात योग्य स्थान आले की तिच्यातल्या अश्लीलतेचा लोप होतो." वाचकाला अशा Simplified जीवनचित्रणापासून परावृत्त करणे, त्याच्या स्वप्नाचा भंग करणे हा अश्लील वाङमयावर खरा उपाय आहे असे पाटणकर म्हणतात आणि आज अश्लील समजले जाणारे वाङमय हे कार्य करते असा त्यांचा दावा आहे. येथे पाटणकरांनी अश्लीलतेच्या लैंगिक बाजूवरच मुख्य भर दिला आहे. प्रेमाचे Platonic चित्रण न करता त्यातच लैंगिक वासनांचीही योग्य जाणीव ठेवली, लैंगिक भावनांचा बागुलबोवा निर्माण केला नाही तर अश्लील हे अश्लील वाटणारच नाही असे त्यांना वाटते आदर्शवादाची झापडे काढून टाकल्याबरोबर लैंगिकतेला योग्य स्थान मिळेल अशी त्यांची कल्पना आहे. परंतु स्वाभाविक लैंगिक प्रवृत्ती आणि लिंगपिसाट मनोगंड यांत फरक आहे. आदर्शवादाची झापडे काढून टाकून लिंगपिसाटतेची झापडे डोळ्यांवर चढविली तर लैंगिकतेला जीवनपटावर योग्य स्थान मिळेल काय ? आज अश्लील म्हणून गणल्या जाणाऱ्या वाङमयाने ही लिंगपिसाट वृत्तीची झापडे डोळ्यांवर चढविली आहेत असा आक्षेपकांचा आरोप आहे. त्याचे खंडण पाटणकर करू शकलेले नाहीत. शिवाय अश्लीलतेची काटेकोर व्याख्या त्यांच्या लिखाणात नाहीच.

'अश्लील वाङमय म्हणजे काय ?' या लेखामध्ये श्री. विश्वनाथ रघुनाथ पाटील यांनी बरेच मूलगामी लेखन केले आहे. त्यांच्या चर्चेची दिशा आणि पद्धती चांगली आहे. "मूलत: चांगल्या असणाऱ्या गोष्टीसुद्धा सार्वजनिक ठिकाणी घडल्यास, चारचौघांत प्रदर्शन केल्यास किळसवाण्या ठरतात. थोडक्यात सांगावयाचे तर शब्द

किंवा दृश्य कलांच्या द्वारे या किळसवाण्या गोष्टींचे इतरांना घडविलेले दर्शन म्हणजे अश्लीलता. आणि शब्दकोशातील व्याख्या पाहिल्या तर असे वाटते की, हे रेखाटन अश्लील का, तर लोकांची सदभिरुची बिघडवील, व्यभिचारास प्रवृत्त करील म्हणून." अश्लीलतेच्या सर्व बाजूंना येथे स्पर्श केलेला आहे. परंतु पुढे मात्र सर्व लेखांमध्ये अश्लीलतेच्या 'बिघडविण्याच्या प्रवृत्ती'वरच जास्त भर दिला गेला आहे. अश्लीलतेच्या इतर बाजू चर्चिल्या गेल्या नाहीत. 'अश्लीलतेबाबत संशोधन' या लेखातही अश्लीलता आणि आचरण, अश्लीलता आणि गुन्हेगारी यांविषयी महत्त्वाचे विचार व्यक्त केले असले तरी मुळात अश्लीलतेची कल्पना आखून घेतलेली नाही.

श्री. के. क्षीरसागर आणि श्री. शेष यांनी ज्या प्रश्नावलीची उत्तरे दिली आहेत, त्यातील पहिलाच प्रश्न 'अश्लीलतेची व्याख्या आपण कशी करता?' हा आहे. "जी जी कृती परिणामसुलभ अशा मनावर विकृत जातीय (Sexual) वृत्तींच्या विषयाची कामुक (Libidinous) उत्सुकता निर्माण करते किंवा त्या कृती मी अश्लील समजतो," असे श्री. शेष म्हणतात. श्री. क्षीरसागरांनी अश्लीलतेची व्याख्या करण्याचे टाळले आहे. पण "Outraging our sense of decency हे एक प्रमुख लक्षण मानता येईल," असे त्यांनी लिहिले आहे.

या सर्वांवरून हेच दिसते की अश्लीलता म्हणजे नेमके काय, तिचे स्वरूप कशा प्रकारचे असते याची बोट दाखविल्याप्रमाणे स्पष्ट अशी चर्चा या अंकात अपेक्षेइतकी सापडू शकली नाही. अश्लीलतेच्या परिणामांविषयी मात्र खूपच मौलिक आणि महत्त्वपूर्ण चर्चा येथे सापडेल. अर्थात अश्लीलतेच्या व्याख्येपेक्षाही तिचे परिणाम हेच व्यवहारामध्ये विचारार्ह अथवा काळजी करण्यासारखे असतात; किंबहुना अश्लीलतेला विरोध करण्याचे कारणही तिच्या परिणामांची भयावहता हेच आहे. तथापि अभ्यासपूर्ण चिकित्सेमध्ये निश्चितता येण्यासाठी व्याख्येची आवश्यकता असते.

## पंचदोष

'अश्लीलता' याकडे एक दोष म्हणून जेव्हा पाहिले जाते, तेव्हा त्यात सामान्यत: पुढील गोष्टींची कल्पना आपल्या मनात अस्पष्टपणे असते :

१. अनैतिकता, २. लैंगिकता, ३. विकृती,

४. ग्राम्यता, ५. मने बिघडविण्याची प्रवृत्ती.

यांपैकी पहिले व चौथे सामाजिक संकेतांवर अधिष्ठित असून दुसरे व तिसरे काहीसे व्यक्तिनिष्ठ आहे. पाचवे कारण परिणामनिदर्शक आहे. यांपैकी एकेकटे कारण घेतले तर ते अश्लीलतेच्या पंजातून सहज सुटू शकेल. उदाहरणार्थ, अनैतिकता ही समाजसापेक्ष आहे. नीतीची कल्पना स्थलकालानुसार बदलते. पौरस्त्य

आणि पाश्चात्त्य नीतिकल्पना, तसेच महाभारतकालीन, मध्ययुगीन आणि अर्वाचीन नैतिक कल्पना यांत जमीनअस्मानाचा फरक आढळतो. यांपैकी कुठल्या ना कुठल्या नीतिकल्पनेचा आधार तथाकथित अनैतिक वाङमयाला मिळू शकेल. शिवाय, अक्षरवाङमयाची कसोटी परिवर्तनीय नीतिमूल्यांना कितपत जखडता येईल हा प्रश्नच आहे. लैंगिकता हीही एक स्वाभाविक प्रवृत्ती आहे, किंबहुना कुठल्याही प्राण्याच्या मूलभूत मन:प्रवृत्तींपैकी (Instincts) ती एक आहे. तिचे प्राबल्य जीवनाच्या सर्वच अंगांमध्ये दिसून येते. लेखनामध्ये तिचा आविष्कार कितपत आणि किती स्पष्टपणे करावयाचा हाच फार तर प्रश्न होऊ शकेल. लैंगिकता संपूर्णपणे टाळणे शक्यच नाही आणि इष्टही नाही. म्हणजेच लैंगिकता हे अश्लीलतेचे स्वभावरूप मूल्य (Qualitative) होऊ शकणार नाही, तर ते परिमाणदर्शक (Quantitative) मूल्य ठरेल. विकृतीचे चित्रण हे तिसरे कारण वर सांगितले ते जीवनदर्शनाचाच एक भाग ठरू शकते. महायुद्धानंतर जागतिक परिस्थितीनेच असे भयानक वळण घेतलेले आहे, की त्या विदारक पार्श्वभूमीवर मानवी जीवन आणि पर्यायाने मानवी मनोरचना कमालीची विकृत, विविध गंडांनी ग्रासलेली, दुबळी, भयाने झाकोळलेली अशी झाली आहे. लैंगिकतेची विकृत, प्रतिकृती त्यात आपोआप गुरफटली गेली आहे. समर्थ जीवनोन्मुख लेखकाला या विकृतीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. तीच गोष्ट ग्राम्यतेची. समाजाच्या (वि)शिष्ट वर्गाच्याच समस्या आणि त्यांचेच जीवनानुभव साहित्यात चित्रीत करण्याचे दिवस आता संपले आहेत. वाङःमयीन विस्ताराबरोबरच समाजाच्या विविध सीमारेषा त्यात आपोआप अंतर्भूत होऊ लागल्या आहेत. शिष्ट समाजाने बहिष्कृत, अवाच्य म्हणून ठरविलेल्या जातिजमाती आणि समाजस्तर यांच्याही अनुभूतींना व व्यथांना वाङमय निकट स्पर्श करू लागले आहे. पूर्वीही असा स्पर्श केला गेला होता, पण त्याचे स्वरूप वेगळे होते. वरवरचे होते. आता समाजस्तराचे पापुद्रे खरवडून त्याच्या गाभ्यात लेखणीचे टोक घुसू लागले आहे. पूर्वी नुसता सहानुभूती (Sympathy) असेल, तर आता साक्षात् सहानुभव (Empathy) आहे. नीचतर समाजस्तराच्या मन:प्रतिबिंबांच्या सुस्पष्ट आकृती वाङमयात त्यामुळे अवतरणे अपरिहार्य झाले आहे. अर्थातच ग्राम्यतेचे अभिधान आणि परिणाम आता परिवर्तनीय झाले आहेत. शेवटचा मुद्दा, अपक्व मनांना बिघडविण्याची प्रवृत्ती, यांवरच अश्लीलताविषयक कायद्याचा मोठा भर आहे. परंतु हा मुद्दा तितकासा महत्त्वाचा नाही, असे श्री. क्षीरसागर म्हणतात ते बरोबर आहे. मुळातच बिघडण्याची प्रवृत्ती असल्याखेरीज केवळ पुस्तकाच्या वाचनाने व्यभिचाराला अथवा अन्य लैंगिक गुन्हेगारीला प्रवृत्त होणे अशक्य नसले तरी असंभाव्य आहे. ज्यांची मनेच बहकलेली असतात, त्यांना अश्लील पुस्तकाचीही जरुरी नसते. त्यांची कल्पनाशक्ती अप्रतिबंधक चालत असल्याने वैद्यकीय, शास्त्रीय वा पौराणिक वर्णनांतूनही ते आपल्याला हवे तसे Interpretation करू शकतात.

चवाठ्यावर घडणाऱ्या पशुपक्ष्यांच्या क्रीडा अथवा वाढत्या लोकसंख्येच्या गर्दीमुळे मानवी व्यवहाराचे झपाट्याने नाहीसे होणारे खाजगी स्वरूप या गोष्टी तर निरोधनाच्या पलीकडच्या आहेत. तेव्हा अपक्व मनांच्या बिघडण्याचा बाऊ करण्याचे कारण नाही. वैयक्तिक प्रतिबंधावरच ही बाब अवलंबून ठेवावी लागेल.

वरील सर्व चर्चा करण्याचे कारण असे की, 'अश्लील' हा शब्द उच्चारल्याबरोबर आपल्या मनात ज्या ज्या गुणच्छटा उभ्या राहतात, त्यांचे समर्थन अभिनिवेशाने वकिली करण्याकडे करता येईल हे उघड आहे. तरीही काही विशिष्ट लिखाणांच्या बाबतीत मनाची प्रतिकूल प्रतिक्रिया होते हेही काही खोटे नाही. एखाद्या पुस्तकावर अश्लीलतेसाठी म्हणून टीका केली जाते तेव्हा हीच परिस्थिती उद्भवते. (संस्कृत साहित्यशास्त्रकार मात्र 'एक दोष' या अर्थाने 'अश्लीलता' हा शब्द नेहमी वापरीत नाहीत. तो एक पारिभाषिक शब्द आहे. जेव्हा 'व्रीडाजगुप्सामङ्गल' उत्पन्न केले जाते, तेव्हा तो दोष ठरतो. अर्थात याच्याही कसोट्या बऱ्याच सैल आहेत. तथापि 'क्वचिद् गुणो यथा सुरतारम्भगोष्ठयाम् शमकथासु च' असे म्हणून त्याची उदाहरणे दिली जातात. अर्थात संस्कृत साहित्यशास्त्रकार अश्लीलाला सदासर्वकाळ निंद्य व दोषार्ह ठरवीत नसून संदर्भानुसार औचित्य पाळण्यावर त्यांचा कटाक्ष असतो.) या ठिकाणी आपण अश्लीलता हा दोष जेव्हा ठरवितो तेव्हा वरील पाचही गोष्टी अस्पष्टपणे आपल्या मनात असतात. त्यांच्या कक्षा सीमारेखित नसून परस्परांत मिसळलेल्या असतात. "अभिरुची विकृत होणे, असभ्यतेचे काही वाटेनासे होणे, हीच फार मोठी सामाजिक हानी होय," असे श्री. क्षीरसागर म्हणतात; त्याचे साकल्याने महत्त्व लक्षात घेतले पाहिजे. नुसते अनैतिक चित्रण, नुसते लैंगिक चित्रण अथवा नुसते विकृतींचे चित्रण म्हणजे अश्लीलता नव्हे. त्या चित्रणाची घाटणी कशा प्रकारची आहे ते पाहिले पाहिजे. वरील पाच गुणच्छटांचे समर्थन कसे करता येईल हे पाहताना आपल्याला हे जाणवते की प्रत्येक वेळी काही काही गृहीते स्वीकारावी लागतात. ही गृहीते पाळली गेली तर अशा लेखनातील तथाकथित अश्लीलतेविषयी कोणाही चिकित्सकास तक्रार करावीशी वाटणार नाही. एरवी मात्र फारशी चिकित्सा न करताही त्यातील हीनतेची दुर्गंधी कोणालाही येऊ शकेल.

ही पथ्ये कोणती, त्यांची तात्त्विक आणि व्यावहारिक बैठक कोणती या सर्वांची अधिकारी चर्चा 'अभिरुची'च्या या विशेषांकात मिळावी अशी अपेक्षा होती. प्रत्यक्षात मात्र, फारसे वाङ्मयीन महत्त्व नसलेल्या शेवटच्या मुद्यावर, अश्लीलतेने अपक्व मने बिघडण्याचा किती आणि कसा संभव आहे, त्याविषयीच्या कायद्याचे स्वरूप काय आहे आणि काय असावे, याचीच विस्तृत चर्चा आढळली. हाही भाग उपकारक आहे, नाही असे नाही; पण त्याबरोबरच जास्त मूलभूत दृष्टिकोनाची वाङ्मयीन अपेक्षा 'अभिरुची'ने पुरी केली नाही असे खेदाने म्हणावे लागते. अश्ली-

लता आणि वास्तवता, कलावंताचे व्यक्तिस्वातंत्र्य आणि त्याची सामाजिक जबावदारी याही मुद्यांचा पुरेसा विकास होऊ शकला नाही.

## बेडेकरांचा सिद्धान्त

केवळ आविष्कारातील अथवा शब्दांमधील अश्लीलता श्री. दि. के. बेडेकर यांनी 'भाषा, साहित्य व काही शब्द' या आपल्या लेखात सांगोपांग चर्चिली आहे. तिचा आवर्जून उल्लेख केला पाहिजे. काही शब्दांमधील ग्राम्यता आणि अश्लीलता साधार स्पष्ट करून, असे शब्द वापरण्याचे समर्थन करणाऱ्यांचे त्यांनी समूळ खंडन केले आहे. या त्यांच्या लेखात आलेले पुढील सिद्धांत महत्त्वाचे आहेत—

१. जे आपले क्षेत्र नाही, त्यात शिरून त्या क्षेत्रातील बंधने तोडण्याचा अट्टाहास साहित्यिकाने करू नये. त्याने तसे केले, तर त्या कृत्याचे समर्थन केवळ साहित्यिक या नात्याने त्याला करता येणार नाही.

२. मानसशास्त्राच्या मायक्रोस्कोपला डोळा भिडवून जे दिसेल ते हुबेहूब शब्दांकित करणे म्हणजे साहित्य नव्हे. साहित्याची दृष्टी स्वायत्त व स्वतःची असली पाहिजे.

३. साहित्यिक अभिरुचीमधील वदल हा धक्के देऊन होणारा नसतो. साहित्यिक अनुभूतीची कक्षा वाढवून होत असतो.

शब्दामधील अश्लीलतेचे स्वरूप, व्याप्ती आणि ती क्षम्य ठरविणारे संदर्भ यांची विस्तृत चर्चा या लेखात आहे. 'अभिरुची' ने काढलेल्या प्रश्नावलीला श्री. क्षीरसागर व श्री. शेष यांनी दिलेली उत्तरेही मूलगामी चर्चेची दिशा दाखवितात. 'अभिरुची'च्या खास लेखांमध्ये मात्र ही दिशा लक्षात घेतलेली नाही. विशेषतः, श्री. क्षीरसागरांची उत्तरे त्रोटक असली तरी मुद्देसूद आणि काटेकोर आहेत, तर श्री. शेष यांनी विस्तारपूर्वक चर्चा केली आहे. दुर्गा भागवत यांच्या 'काही टिपणां'तून दिसणाऱ्या अभ्यासक आणि निर्भय दृष्टीचाही उल्लेख करावयास हवा.

एकंदरीत पाहता 'अभिरुची'च्या या विशेषांकात पुढील उणिवा प्रकर्षाने जाणवल्या :—

१. अश्लीलतेच्या परिणामांना जास्त महत्त्व देऊन तिचे स्वरूप, निकष, संदर्भ आणि महत्त्व यांना कमी महत्त्व दिले गेले आहे.

२. 'मराठा' वर टीका करताना तात्त्विक भूमिकेपेक्षा वरवरची भूमिकाच घेतली गेली. अत्रे 'विष्ठावाद', 'मात्रागमन' वगैरे शब्द वापरतात ते चूक असेल. पण त्यांचा मुद्दा :—'गलिच्छ लिखाण केवळ गलिच्छतेतील हीन आनंदासाठी व पैशासाठी करण्याची साथ मराठी लेखकांत पसरत चालली आहे,' त्याचे तात्त्विक खंडन केले गेले नाही. 'अभिरुची'ला ते करता आले असते, आणि 'अभिरुची'ने ते करावे अशी आमची अपेक्षा होती.

३. 'वाचकांना एखादे पुस्तक वाचू नका, असे अत्र्यांनी सांगणे म्हणज वाचकांचे व्यक्तिस्वातंत्र्य आणि मतस्वातंत्र्य नाकारून त्यांचा अपमान करण्यासारखे आहे,' हा मुद्दा अगदीच बाजूचा, पोकळ आणि बालिश आहे. अत्रे म्हणजे काही हायकोर्ट नव्हे. जो वाचक खरोखरीच आपल्या मताविषयी जागरूक नि प्रामाणिक असेल तो अत्र्यांनी एखादे पुस्तक वाचू नका म्हटल्याबरोबर आपले मतस्वातंत्र्य टाकणार नाही. उलट जो तसा जागरूक नसेल तर त्याच्या मताला काहीच किंमत नाही. व्यक्तिनिंदेची जी चूक अत्रे करतात असे 'अभिरुची'चे म्हणणे आहे, तीच 'अभिरुची'ने करावी काय?

४. दिलीप चित्र्यांनी या अंकात एकूण तीन लेख लिहिले आहेत. पण अनेक ठिकाणी जाहीर टीकाविषय झालेल्या 'केसाळ कुत्र्याचे पिलू' या आपल्या कथेच्या समर्थनार्थ त्यांनी एक ओळही लिहिली नाही. इतरांना अश्लील वाटणाऱ्या या चित्रणात कोणती अगतिक, विफल, दुबळी अनुभूती त्यांना दाखवायची आहे; अपेक्षित शब्दाच्या उपयोगाने कोणत्या विचारपातळीचा छेद त्यांना घ्यावयाचा आहे त्याचा निर्भीड खुलासा एक टीकाकार म्हणून त्यांना स्वतःला करता आला असता. वाचकाची साहित्यिक अभिरुची जर बदलावयाची असेल तर जे आपल्या वाङ्मयकृतीचे तटस्थपणे विवरण करू शकतात अशा लेखकांनी आपली भूमिका वेळोवेळी सुस्पष्ट करणे अगत्याचे आहे.

५. या अंकात नऊ अन्यभाषीय लेखांचे भाषांतर दिले आहे. अश्लीलतेला सामाजिक संदर्भाचे अधिष्ठान असल्याने परक्या चष्म्याने पाहणे धोक्याचे असते.

अर्थातच ज्या विषयांची चर्चा अभिरुचीने केलेली आहे ती महत्त्वाचीच आहे, यात शंका नाही. मुख्य म्हणजे एका महत्त्वाच्या विषयाच्या मुळाशी जाण्याचा प्रयत्न 'अभिरुची'ने केला आहे हे स्तुत्य आहे. हा प्रयत्न आणखी थोडा सखोल आणि सर्वांगीण व्हावयास हवा होता इतकेच. प्रस्तुत विशेषांक हा परिश्रमपूर्वक काढलेला आहे, अभ्यासपूर्ण आहे, चिंतनशील आहे, विचार करावयास लावणारा आहे; पण अश्लीलतेच्या सर्व पैलूंवर प्रकाश पाडणारा नाही. त्याची उंची मोठी आहे, पण आवाका मर्यादित आहे.

**—निशिकांत मिरजकर**



# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

## □ हलो, मी देवमासा बोलतोय्......

अमेरिकेत एका समुद्रशास्त्रज्ञाने दोन देवमाशांना टेलिफोनवर एकमेकांशी बोलायला लावायचा प्रयोग करून पाहिला तेव्हा त्या दोघांनी म्हणे तासभर मनसोक्त गप्पा मारल्या. माशांचीदेखील एक भाषा असते, असे ऐकले होते खरे; पण तासभर शिळोप्याच्या गप्पा मारण्याइतकी ती प्रगल्भ असेल याची कुणा लेकाला कल्पना ? काय बरं या गप्पा झाल्या असतील ? एक देवमासा दुसऱ्याला म्हणाला असेल, "काय अ–साहेब, काय खबरबात ? काय म्हणतं तुमच्याकडचं (हवा) पाणी ?" अ म्हणाला असेल, "काय सांगू ब–राव, काल एक आगबोट पाठीवरून गेली तेव्हापासून अशी पाठ धरलेय् म्हणता..... तुमच्याकडे सगळं ठीक ?" ब-नं उत्तर दिलं असेल, "तसं ठीक आहे, पण आमच्या छोट्याला जरा सर्दी झालीय्– फारच पाण्यात खेळतो......"

पण एक चुकलेच. सबंध तासभर टेलिफोनवर गप्पा मारू शकणारे हे देवमासे नर नसणार, मादी असणार. कारण ते असते तर "कसं काय ?" "बरं आहे." एवढे एकमेवाद्वितीय प्रश्नोत्तर झाल्यावर दोघांनी रिसीव्हर खाली ठेवला असता. ते काही असले तरी एकदा मासे टेलिफोन करू लागल्यावर जे जळी तेच स्थळी दिसू लागले तर नवल नाही. उद्या आमचा मोत्या शेजारच्या टिप्याला फोन करून विचारील, "लेका टिप्या, काल चंपीवर लाईनिंग कोण करीत होतं ?" टिप्या उत्तर देईल, "अरे हट्, तूच तिच्यापुढे लांगूलचालन करीत असतोस..." आमची मनीदेखील मावशीला ट्रंक कॉल करून म्हणेल, "मावशी, आठवडाभर रजा काढून इकडे येऊन जा. यंदा उंदीर खूप पिकलेत..." मुख्य म्हणजे यापुढे कुठल्याही बालकथेत कावळ्याला चिऊताईच्या दरवाज्यात नॉक करून "चिऊताई, चिऊताई, दार उघड," अशी हाकाटी करावी लागणार नाही. तो टेलिफोनवर अँपॉइंटमेंट घेऊनच जाईल.

## □ हसायचा हुकूम

रशियात हसायचा हुकूम सुटला आहे असे परवा वर्तमानपत्रांत वाचले. एप्रिल फूलचा दिवस 'हास्यदिन' म्हणून साजरा करण्याचा प्रघात सोव्हिएट रशियात यंदा पासून सरकारी हुकमान्वये सुरू झाला आहे; म्हणजे आपल्याकडे माणसे मोलाने

रडतात तशी रशियात हुकमाने हसणार. आता "लोकांची लोकशाही" असणाऱ्या कुठल्याही देशातला सरकारी हुकूम म्हटला की लोकांच्या विरुद्ध त्याची कडक अंमलबजावणी आलीच; तेव्हा या विशिष्ट दिवशीं जो सोव्हिएट नागरिक आज्ञाधारकपणे दात विचकणार नाही त्याचे दात पडतील हे ओघानेच आले.

दुसरे म्हणजे कायदा म्हटला की कलमे आलीच. तेव्हा हसायचा हुकूम म्हटला की केव्हा कसे हसायचे हा तपशील हवाच. म्हणून हास्याचे सरकारी प्रकार ठरवून द्यायला हवेत व कोणत्या वेळी कसे हसणे कायदेशीर आहे याचा तक्ता तयार करायला हवा. नाही तर आपल्या देशात हसायचादेखील हुकूम काढावा लागतो. अशी हास्यास्पद परिस्थिती झालेली पाहून सोव्हिएट नागरिकाला हसावे की रडावे हेच कळेनासे व्हायचे.

## □ कला आणि पाणीपुरीचा समसमा संयोग

इंग्लंडात एका शाळेच्या विद्यार्थ्यांनी काढलेल्या चित्रांच्या स्पर्धेत तीन माणसांचे परीक्षक-मंडळ नेमण्यात आले. त्यात एक बस कंडक्टर होता, एक सिनेमागृहातला द्वारपाल होता, तर एक हॉटेलात वेटर होता. "लोकप्रिय" कलेतले "लोक" ते हे! चित्राच्याच काय पण कुठल्याही कलाकृतीच्या परीक्षक-मंडळात दोन जाणकार व एखादा 'सर्वसाधारण' लोकांतला माणूस ठेवतात असे मी ऐकलें होते; पण कुठलीही "लोक"–प्रिय झालेली कलाकृती जाणकार समीक्षकाला आवडत नाही, असा सर्वत्र अनुभव आल्याने या बाल-कलाकारांनी जाणकारांना मुळातच कटाप केलेले दिसते. शिवाय हल्ली कला जाणण्याचे दिवस राहिलेले नाहीत; कारण पूर्वीच्या ईश्वराप्रमाणे आजची कला जाणून घेण्याच्या पलीकडे गेलेली आहे. अर्थात पूर्वी ईश्वर पावलेला माणूस ज्याप्रमाणे ईश्वर काय हे दुसऱ्याला सांगू शकत नव्हता, त्याचप्रमाणे आधुनिक कलेचा साक्षात्कार झालेला जाणकार आपले ज्ञान दुसऱ्याला देऊ शकत नाही. तेव्हा सांगायचे काय, लघुकथांची स्पर्धा ठेवली तर परीक्षक म्हणून एक बिगारीतला मुलगा, कोपऱ्यावरचा पाणीपुरीवाला व महिन्यातून एकदा येणारा रद्दीवाला यांना नेमावे, आणि नवकाव्याची चढाओढ असेल तर परीक्षक म्हणून एक रिकामा न्हावी, एक उद्घाटन–कुशल मंत्री आणि पहाटे भूपाळी म्हणणाऱ्या आजीबाई यांना नेमावे.


## □ दुष्काळात करमणुकीचा सुकाळ

दुष्काळ-निवारणासाठी काय काय करायचे असते याचे एक तंत्रच हिंदुस्थानात ठरून गेलेले आहे. दुष्काळ-निवारणाचा आपला पहिला आवडता उपाय म्हणजे नाटके करणे. त्या नंतर संगीताचे जलसे, फॅशन-स्पर्धा, सिनेमाचे खास प्रयोग असली विविध व प्रभावी उपाययोजनाही केली जाते. काही लोक तर अन्न-धान्य गोळा करण्यासारखा किरकोळ उपायही करून बघतात. पण परवा वर्तमानपत्रात वाचले

की ऑक्सफॅम या सुप्रसिद्ध ब्रिटिश दुष्काळ-निवारक संस्थेने दुष्काळ-निवारणासाठी बाबागाड्यांची शर्यत लावली–पण रहदारीला अडथळा होतो; या सबबीवर पोलिसांनी तिला परवानगी दिली नाही. पाहिलेत, दुष्काळ-निवारण्यासाठी शास्त्रात एका महत्त्वाच्या शोधाची भर पडायची चुकली. मोटारींच्या, सायकलींच्या व विमानांच्याही शर्यती होतात, कुत्र्यांच्या शर्यती होतात; इतकेच काय पण झुरळांच्या शर्यतीदेखील मला माहीत आहेत. पण बाबागाड्यांच्या शर्यतीची कल्पना ज्याच्या डोक्यातून निघाली त्याच्या डोक्यात कल्पनांचा दुष्काळ पडण्याची कधीच भीती नाही. शिवाय माझ्यासारख्या अरसिकांची केवढी सोय; कारण एक तर आपल्याकडे दुष्काळ नेहमीच चालू असतो. त्यात कल्पनांच्या दुष्काळाची भर पडते; त्यामुळे दुष्काळ आलारे आला की आता आपल्यावर एखादे संगीत नाटक किंवा हिंदी सिनेमा पाहण्याचा, किमान तास दोन तास शास्त्रीय संगीत ऐकण्याचा दुर्धर प्रसंग ओढवणार म्हणून मी हवालदिल होतो. पण आता मला हायसे वाटले. हिंदुस्थानातल्या प्रत्येक दुष्काळात बाबागाड्यांची शर्यत ठेवली तर दुष्काळ इतके लोकप्रिय होतील की त्यांच्यावर करमणूक-कर ठेवावा लागेल.

## □ मनी मांजरीचा चष्मा

विश्वास ठेवा अगर ठेवू नका, ऑस्ट्रेलियाच्या काही भागांत जमीन इतकी रेताड आहे की तेथे असणाऱ्या मेंढ्यांचे दात दोन-तीन वर्षांत निकामी होतात, म्हणून तेथल्या मेंढपाळांनी आपल्या मेंढ्यांना कवळ्या बसवून घेतल्या आहेत! आता रेड्याला हॅट, घोड्याला बूट, कुत्र्याला सूट अन् वांदराला झबले हे प्रकार माहीत होते; पण मेंढीला कवळी लावलेली भूतदयावादी हिंदुस्थानातदेखील ऐकिवात नाही. मात्र कल्पना अनुकरणीय यात शंकाच नाही. कालच आमच्या मनीच्या अगदी समोरून उंदीरमामा पळाले, पण मनीचा नेम चुकला. नाही तरी तिला हल्ली अंधारात नीटसे दिसत नाहीच, तेव्हा तिला शॉर्ट साइटचा चष्मा लावला पाहिजे, असा विचार माझ्या मनात येऊ लागला आहे, नाही तर बिचारीची अन्नान्नदशा व्हायची. मोत्याचाही हल्ली भुंकून भुंकून घसा बसला आहे, तेव्हा त्याच्या गळ्यात लाऊडस्पीकर अडकवला की बिचाऱ्याला शिरा ताणायला नकोत. आणि यंदाच्या निवडणुकीत बैलांची जोडी का मागे पडली ठाऊक आहे? त्यांनी रनिंगचे जोडे घातले नव्हते.



STUSA

# भारतांतील शेतीव्यवसायाचा कायापालट...

भारतांतील शेती ही गेलीं हजारों वर्षें परंपरागत पद्धतीनें केली जात होती; पण आतां या प्रचंड व्यवसायाचा कायापालट होत आहे. किर्लोस्कर लोखंडी नांगर हे या क्रांतीच्या प्रारंभाचें प्रतीक होय. त्यानंतर विविध प्रकारचे सोयिस्कर नांगर, पेरणी यंत्र, पाणी पुरवठा करणारे अनेक प्रकारचे सेंट्रिफ्युगल पंप आणि विविध यांत्रिक साधनांची निर्मिति करून किर्लोस्कर कारखान्यानें शेती व्यवसायाच्या आधुनिकीकरणाला जोराची गती दिली आहे.

## किर्लोस्कर



**किर्लोस्कर ब्रदर्स लि.,**
किर्लोस्करवाडी, जि सांगली.

# प्रयोग स्वागतार्ह, थोडा विचित्र

## सादरकर्ते : सुरेश खरे–नंदकुमार रावते

नाट्य मंदिरावर प्रेक्षकांची गर्दी उसळली आहे. जागेवर बसून हाश ऽ हुश् करीत बसण्यापेक्षा बाहेर मोकळ्या हवेत "नाट्य–चर्चा" करणे मंडळींना जास्त पसंत आहे. गप्पा रंगात आल्या असतानाच घंटा निनादते. क्षणभर दुसरी का तिसरी यावर वाद होतो. वाद संपण्यापूर्वीच प्रेक्षागृहामध्ये काळोख पसरतो. दोन–चार मिनिटे जरा गडबड, अंधारातच जागा पकडण्याची धावपळ. इतक्यात रंगमंच आणि प्रेक्षक यांच्यांतील दुरावा अलगद दूर होतो.

रंगभूमीवर नेहमीपेक्षा काहीतरी वेगळं दिसतं. 'सुरुवातीलाच कोर्ट–दृश्य जरा चमत्कारिक'च असं काहीसं पुटपुटत प्रेक्षक सावरून बसतो. सुरेश खरे यांच्या 'स्वर जुळता गीत तुटे'ची सुरुवात होते ती अशी !

नाटकाचे दिग्दर्शक श्री. नंदकुमार रावते यांनी कोर्टातील कामकाजाबरोबर प्रेक्षकांना पूर्वसूत्र कथा–पद्धतीने (Flash-Back) कोर्ट व मूळ घटनास्थळ यांची सुरेख सांगड घालून एक विलक्षण कथा या नाट्याद्वारे सादर केली आहे.

व्यसनाने बरबटलेल्या नीती-अनीतीच्या कल्पनेच्यापलीकडे गेलेल्या साने नावाच्या इसमाची व त्याच्या मुलीची–शोभाची–ही कथा. शोभा घरातील मोठी मुलगी, खाली धाकटी तीन भावंडे, कर्ता बाप सक्तीची निवृत्ती स्वीकारून घरी बसलेला. घरची चूल पेटणार कशी याची सर्व चिंता एकट्या शोभाला.

लग्नाचं वय व घरची जबाबदारी अशा दुहेरी कात्रीमध्ये सापडलेली ही मुलगी दोन्ही गोष्टी एकत्र साधता येतील, असा प्रयत्न करते. लग्नही करावं व भावंडांचाही सांभाळ करावा अशी तिची मनोमन इच्छा असते. आपले मनोगत आपला प्रियकर प्रभाकर पूर्ण करील, अशी तिची अपेक्षा असते. परंतु स्वार्थापायी आंधळा झालेला हा बाप मुलीच्या लग्नाच्या आड येतो. तिच्या प्रियकराला खोटीनाटी माहिती सांगतो.

प्रभाकर हा एकमात्र आधार नाहीसा झाल्यावर शोभाच्या जीवनातील चैतन्य हरवून जाते. सुटकेचा मार्ग एकच. चिमुकल्या भावंडांसह आत्महत्या. दैवाचे फासे इथेही उलटे पडतात. छोटे जीव प्राणाला मुकतात. मागे राहिलेली शोभा आरोपीच्या पिंजऱ्यात उभी राहते.

तिचा बाप स्वार्थापोटी खडबडून जागा होतो. शोभा गेली तर आपले कसे होईल याची विवंचना त्याला लागते. अनंत खटपटी करून कर्जाचा बोजा उरावर घेऊन

खोटया साक्षी उभ्या करून तो लेकीची सुटका करतो. आयुष्य सुधारण्याचा केविलवाणा प्रयत्न अपुरा आहे अशी त्याची खात्री पटते. कर्ज देणारा कांतिलाल पैशासाठी तगादा सुरू करतो. रोखीने अथवा 'अन्य मार्गाने' रक्कम वसूल करण्यास कांतिलाल आतुर असतो. पक्क्या दोघांनी विणलेल्या या जाळ्यात साने अलगद अडकतो. पोटची पोर मवाल्याच्या शेजेवर ढकलण्यापर्यन्त त्याची मजल जाते. जिवाच्या आकांतानं जपलेलं शील सांभाळण्यासाठी शोभा बापाचा गळा दाबून खून करते.

सुरेश खरे यांचा कथाविषय धाडसाचा आहे. कथेची मांडणी दोन अंकांपर्यन्त तरी सरळ टोकदार आहे. समर्थ दिग्दर्शकाच्या (नंदकुमार रावते) सामर्थ्यातून त्यांची कथावस्तू रंगभूमीवर आली आहे. मामा पेंडसे, भावना, टाकळकर, वसंत खरे, या मातब्बर कलावंतांनी तिला जिवन्त केले आहे. तंत्रकथा, मांडणी व अभिनय, या तिन्ही पातळ्यांवर नावीन्याचे दर्शन घडते. शोभाच्या आयुष्यातील घटना आणि न्यायालयीन कामकाज या दोन वेगळ्या पातळ्या सुसंबद्धपणे सांधल्या गेल्याने कथावस्तू प्रवाही राहिली आहे. शोभा, शोभाचा बाप, तिचा प्रियकर, या सर्व व्यक्तिरेखा पहिल्या दोन अंकांत सुस्पष्ट होतात.

लता जुकर व टाकळकर यांच्या कौशल्याने एक्ट्रॉ नटीची—रूपादेवीची—साक्ष चांगलीच रंगली आहे. प्रभाकर व साने यांच्या प्रवेशांमधून आढळणारे वास्तवतेचे दर्शन शोभा व प्रभाकर यांच्या प्रवेशात आढळत नाही. या प्रवेशातील टेबल—खुर्च्यांची मांडणी थेट हॉटेलच्या फॅमिली रूमसारखी आहे. प्रभाकरचे सरळ, एकमार्गी जीवन सूचित करण्यासाठी मुद्दाम अशी मांडणी केली असावी असे वाटते प्रेक्षकांना मात्र हे फारसे रुचले नाही.

दोन्ही अंकांतील कोर्ट-दृश्ये उत्कृष्ट उभी केली आहेत. किरकोळ साक्षीदारांवरही भरपूर मेहनत घेण्यात आली आहे. संयमित अभिव्यक्तीबद्दल जज्ज एलिस रासराजकर यांचा मुद्दाम उल्लेख केला पाहिजे. 'टाकळकर—पेंडसे' जुगलबंदीला प्रेक्षकांनी दिलखुलास साथ दिली, तर काळा चष्मा, फरकॅप, घालून ज्युरीमध्ये बसलेल्या रणजीत बुधकरांना जेव्हा 'ज्युरीतील सभ्य स्त्री-पुरुषहो' म्हणून संबोधण्यात आले, तेव्हा उपरोधिक हशा पिकला. बहुधा आपण ज्युरी बॉक्समध्ये आहोत, याची बुधकरांना जाणीव नसावी.

नाटकाचा तिसरा अंक भोंगळ, अवास्तवतेने भरलेला व अतिरंजित नाट्याने

पहिल्या दोन अंकांमध्ये मिळवलेल्या यशावर काहीसे विरजण घालणारा आहे तिसऱ्या अंकांमध्ये सान्यांच्या घराच्या आतील भागाचे दर्शन घडते. संशयाचा फायदा मिळून सुटलेली शोभा अस्वस्थ स्थितीत वावरत आहे. मावंडांच्या जुन्या आठवणीने तिचा जीव कातावून गेला आहे. इतक्यात कोर्टामध्ये तिच्यातर्फे बचावाचे काम केलेला वकील वसंत खरे येतो. काहीसे 'इमोशनल' बोलतो आणि तडक लग्नाची मागणी घालतो. निश्चित उत्तर न देता शोभा त्याला वाटेला लावते. जुना प्रियकर प्रभाकर येतो. त्याच्याबद्दल—विशेषत: त्याच्या व्यवहारीपणाबद्दल—शोभाच्या मनामध्ये कमालीचा तिटकारा असतो. स्वाभाविकपणे त्याची लग्नाची मागणी धुडकावून शोभा बाहेर जाते. कांतिलाल व साने यांच्या संवादांतून कांतिलालचा हेतू सुस्पष्ट होतो. आपली मागणी स्पष्ट करून तो निघून जातो.

शोभाजवळ साने आपला हेतू स्पष्ट करतात. दारावर कांतिलालच्या धडका बसतात. आणि शोभा बापाचा खून करते.

सगळेच विचित्र. बचावाचा वकील व रूपादेवी यांना या अंकात वास्तविक मुळीच स्थान नाही. रूपादेवी येऊन जे सान्यांजवळ सांगते त्याचा स्पष्ट अर्थबोध मुळीच होत नाही. रूपादेवीची व्यक्तिरेखा उज्वलीत करण्याचे कारण काय ? अत्यंत व्यावहारिक पातळीवरून वागणारा वकील या परिस्थितीत मुलीला मागणी घालील का ? ज्या घरासंबंधी तिला थोडीही आस्था उरलेली नाही, अशा घराला शोभा का चिकटून राहते ? या प्रश्नांना उत्तरे नाहीत. का तिची अस्थिर मन:स्थिती एवढेच कारण ? शोभा तुरुंगातून सुटली आहे, हे समजण्याइतके प्रेक्षक खचित सुज्ञ आहेत. न्यायालयाचा निर्णय ऐकवण्यामागील स्वारस्य समजू शकले नाही.

शोभा अशा मन:स्थितीप्रत येऊन पोहोचली आहे की आपला बाप आपल्याला कांतिलालकडे लोटणार, याची जाणीवही तिने बापाचा खून करण्यास पुरेशी आहे. कांतिलालच्या धडका व आरडाओरडा ऐकवून प्रसंग भडक करण्याचे प्रयोजन काय ? कांतिलाल व साने यांच्या संवादांमधून पांढरपेशावर्गाला—ब्राह्मणांना—ओढण्याची काहीच आवश्यकता नव्हती. का कांतिलालची 'मेन्टॅलिटी' या गोष्टी आणते असे समजायचे ?

अनेक शंका व अनुत्तरित प्रश्न या अंकामध्ये आहेत. नाटकाच्या यशावर त्यांचा खचित परिणाम होतो. मात्र तरीही अनेक कलावंतांच्या बहारदार अभिनयाने नटलेला हा प्रयोग स्वागतार्ह वाटतो. कथाविषय पाश्चात्त्य विचारधारेशी जुळणारा असला तरी, आपल्याकडे नवीन आहे. नाटककाराने समाजाला काही सांगण्याचा आव आणलेला नाही. समाजाच्या काही वर्गांमध्ये असेही घडत असेल, त्याचे हे वास्तव दर्शन स्वागतार्ह म्हणावे लागेल. भिकार नाट्य, आणि तमाशा—नाट्य या पार्श्वभूमीवर या नाटकाचे यश अधिक उंचावते.

□

# ४८ मराठी नाट्यसंमेलन सालाबादप्रमाणे यंदाही....

मराठी नाट्य परिषदेच्या विद्यमाने सालाबादचा हा वार्षिक सोहळा यंदा पुणे मुक्कामी पार पडला. वास्तविक पाहता पूर्वनियोजित कार्यक्रमाप्रमाणे पंढरपूरच्या वाट्यास हे भाग्य यायचे, परंतु पंढरपूरकरांनी अळंटळं चालवल्याने पुण्याच्या काही अर्धवेळ नाट्य व्यावसायिकांनी पुढाकार घेतला आणि पुण्यासाठी हा योग जमवून आणला.

संमेलनाध्यक्ष स. अ. शुक्ल : वय वर्षे–६५. कायम वास्तव्य मुंबई.

व्यवसाय : पूर्ण वेळ साहित्यिक.

साहित्यसेवा : नाटके एकूण अकरा. त्यांपैकी काही– सत्याग्रही, सिंहाचा छावा, साध्वी मीराबाई, स्वर्गावर स्वारी, सौभाग्यलक्ष्मी. आगामी–एकाच माळेचे मणी. याखेरीज पाच कादंबऱ्या, दहा काव्यसंग्रह. विशेष गाजलेले पद–रमला कुठे ग कान्हा.

**शनिवार दि. २२–४–६७**

संध्याकाळीं औपचारिक उद्घाटन व नवीन अध्यक्षांचा अधिकार स्वीकार.

अध्यक्षीय भाषण : वेळ सुमारे ४५ मिनिटे. विशेष नोंदी : प्रेक्षकांना आनंद देते ते नाटक, अशी नाटकाची व्याख्या करून अध्यक्ष म्हणाले, नाटक रंजन करणारे व अंजन घालणारे असावे.

आजच्या नाट्य व्यवसायात सर्व बाबतींत चित्रपट व्यवसायाचे अनुकरण, निवडक नटांच्या मोठ्या मोबदल्यामुळे निर्मात्यांची हानी, प्रयोग–संस्थांच्या धुमधडक्यामुळे नाट्यकलेचे नुकसान, सध्याची रंगभूमी ही Mobile Theatre बनली आहे, हे भाषणातील इतर उल्लेखनीय मुद्दे.

व्यवसायाला स्थिरता येण्यासाठी परस्पर सहकार्याची आवश्यकता आहे. व्यावसायिक रंगभूमीच्या स्थैर्यातून नाट्याचे सुवर्णयुग पुन्हा निर्माण होऊ शकेल. मात्र त्यासाठी महाराष्ट्रभर बंदिस्त नाट्यगृहांची साखळी निर्माण झाली पाहिजे–अपेक्षा.

**रविवार दि. २३–४–६७**

अत्यंत कंटाळवाणा परिसंवाद. विषय : रंगभूमीला आचारसंहितेची आवश्यकता. उपस्थिती सुमारे–३००. सूत्रचालन–के. नारायण काळे.

वक्ते : प्रा. कृ. गो. सूर्यवंशी, श्री. आयरे, सौ. मीना पेठे, बाबुराव जोशी, मधुसूदन करमरकर, सौ. सुशीला आठवले, मु. रा. लोणकर, सौ. सरोज तेलंग, श्री. वि. ना. कोठिवाले व राजाराम हुमणे. [ सर्व नावे मुद्दाम अशासाठी दिली की व्यवसायिक रंगभूमीशी सध्या प्रत्यक्ष संपर्क असलेला एकही वक्ता यांमध्ये नाही.

सायंकाळचे खुले अधिवेशन या अधिवेशनामध्ये—

१. ललितकला पीठ स्थापन करण्यात यावे.

२. जुन्या नटांना अनुदानरूपाने मदत करण्यात यावी.

३. व्यावसायिक अडचणी दूर करण्यासाठी परिषदेच्या पुढाकाराने व्यावसायिक संघ त्वरित निर्माण करावा.

४. परिषदेने मराठी रंगभूमीविषयक त्रैमासिक सुरू करावे.

दोन दिवसांच्या संमेलनामध्ये खऱ्या अर्थाने उत्साह कुठेच आढळला नाही. व्यावसायिक रंगभूमीशी संबंध असणारे, हौशी रंगभूमीवर वावरणारे, आणि या दोघांच्या मागे लागणारे समीक्षक नावाचे प्राणी यांची उपस्थिती अभावाने जाणवली.

नागपूर, औरंगाबादपासून आलेल्या १७५ मंडळींपैकी फारच थोडी परिचित आढळली.

सरकारी मंत्रिगणांखेरीज वि. स. खांडेकर, दुर्गाबाई खोटे, वि. वा. शिरवाडकर, आदींनी संदेश पाठविले.

नाटच-प्रयोगांची निवड काही जणांना फारशी रुचली नाही.

बाहेरगावाहून मुद्दाम संमेलनासाठी आलेल्या प्रतिनिधींशी चर्चा केली असता ' आमच्या भागात हल्ली फार उकडतं, जरा चार दिवस चेंज म्हणून इकडे आलो झालं,' असं मसालेवाईक उत्तर ऐकायला मिळालं.

**एक पत्रकार** : संमेलन पुण्याला झालं हे बाकी झक्क झालं.

**मी** : का हो, काही विशेष !

**उत्तर** : दोन दिवसांच्या मजकुराची चिंता मिटली.

**एक हौशी कलावंत** : " भाकड चर्चेने वैतागून गेलो बुवा."

एक चुकून आलेला व्यावसायिक : " आमच्याकडून जवळ जवळ सक्तीने पैसे वसूल केले. कितपत कारणी लागतात ते बघावं म्हणून आलो झालं."

**मी** : काय मत झालं मग ?

**उत्तर** : निराशा, दुसरं काय ?

परिसंवादासाठी आलेला एक ' रसिक ' प्रेक्षक : (परिसंवाद संपल्यावर) " च्यायला, मॅटिनीला गेलो असतो तर बरं झालं असतं."

एक शाळकरी विद्यार्थी— (१० वी – ११ वीचा असावा)

**मी** : कारे, बाबा इकडे का—

**उत्तर** : बाहेरून चाललो होतो, जरा कमान बिमान दिसली, म्हणून जरा आत डोकावलो इतकंच.

**मी** : मग आता बसणार असशील.

**उत्तर** : छे, हा निघालो.

**शरद गोखले**

ज्वलंत राष्ट्रवादाच्या

भयातक दीप्तीचा

ललितभव्य आलेख

# नाझी भस्मासुराचा उदयास्त

रा. म. शास्त्री

मूल्य पंचवीस रुपये

'माणूस'मधून प्रसिद्ध झालेल्या

प्रदीर्घ लेखमालेची सुधारित ग्रंथावृत्ती.

राजहंस प्रकाशन,

४१९ नारायण पेठ, पुणे २.

# उर्दू वार्ता

संकलन : हिदायतखान

## ☐ कुंतलांची किंमत

'तुझं आहे तुजपाशी 'मध्ये पु. लंचा 'शाम' जेव्हा गीतेला म्हणतो, "ए तुझ्या कपाळावरच्या त्या खटचाळ बटा आधी आवर बुवा! मला कससंच होतंय!" तेव्हा आपले सुपारीएवढे अंबाडे गंगावनाच्या भरघोस कचभारात झाकणाऱ्या हल्लीच्या 'सुमा–हेमा 'पण कोण अकडतात! आपल्या 'साधना–कटा 'वरून लडिवाळपणानं हात फिरवीत किंवा 'पोनीटेल 'चे शेपटे उडवीत नाटयगृहातील तरुणांकडे असा काही कटाक्ष त्या टाकतात की बस्स!

कविकुलगुरू कालिदासाची मानसकन्या शकुंतलेसारख्या लांबसडक व मऊसूत केशाच्या कांता हल्ली दुर्मिळच! (अपवाद–तेलाच्या जाहिरातीतील स्त्री!) मग ओ, हेन्रीच्या नायिकेसारखी सुवर्ण कुंतलांची सुकेशा, आता सुवर्ण नियंत्रण उठले असले तरी, आढळणे नाही! पण तरीदेखील सुप्रसिद्ध उर्दू कवी 'मीर' म्हणतात त्याप्रमाणे—

हम हुए, तुम हुए, कि 'मीर' हुए
सब तेरी जुल्फों के असीर हुए।

आम्ही सारे सुंदरीच्या कचपाशात स्वतःला 'गिरफ्तार' करायला भारी उत्सुक! पण हे किती दिवस? नव्याची नवलाई संपेपर्यंत!

कालांतराने 'भरलेल्या घरात' जेव्हा आपण केस विंचरायला म्हणून कंगवा हातात घेतो तो कंगव्यात आपल्याला आढळतो, तो फक्त बायकोच्या केसांचा गुंता! मग हे सारं काव्य कुठल्या कुठं विरतं. उरतं ते केवळ चिडणं, केसांवर! स्वतःवर!

परंतु यापुढे तुम्हांला कंगव्यात हा गुंता मुळीच आढळणार नाही! पाश्चात्त्य देशांतील महिलांप्रमाणे भारतातील महिलाही विंचरताना निघालेले केस यापुढे वेंधळ्यासारखे कंगव्यातच ठेवणार नाहीत. ते जपून ठेवतील! साठवतील! आणि बाजारात नेऊन गंगावनं बनविणाऱ्या कंपन्यांना विकतील!

–काय? सारा आचरटपणा? अहो, 'उर्दू अखबार 'च्या 'बहनों का कालम' मध्ये एका लेखिकेने अखिल महिला जगताला हे मौलिक आवाहन केले आहे!

## ☐ सिगरेट की सुंदरी?

केवढा विचित्र विकल्प हा!–सिगरेट की सुंदरी! हे म्हणजे एखाद्या क्षुधिताला 'सांग! काय हवंय् तुला? जेवण की पाणी?' असं विचारण्यासारखंच झालं;

कारण, पुरुषांना चट्का लावणे, यासाठीच उभयतांचा जन्म ! किंबहुना, एक जेव्हा चटका लावून निघून जाते, तेव्हा दुसरीच्या धगधगत्या चटक्यानंच पहिलीनं केलेल्या जखमेवर 'फुंकर' घालावी लागते !—अगदी काट्यानं काटा काढावा त्याप्रमाणं !

परंतु हे सारं जरी खरं असलं तरी तिकडे पाश्चात्त्य देशांत कसले ना कसले संशोधन नेहमी चालू असते आणि त्याचे रीतसर अहवालही प्रसिद्ध होत असतात, आकडेवारीसह ! त्यांत कॅन्सरच्या रोग्यांत अमुक टक्के लोक कमालीचं धूम्रपान करणारे होते, असेही अहवाल असतात ! त्या वेळी 'सिगरेट की सुंदरी !' असा मोठा निर्वाणीचा पेच आपल्यापुढे पडतो. कारण, तुमच्या प्रियेला किंवा पत्नीला एवढ्या 'अल्प वयात' वैधव्य नको असते ना !

खरं म्हणजे बायका सिगरेटचा तिरस्कार का करतात बरं ! एका विनोदी लेखकानं त्यांची 'कैफियत' त्यांच्याच शब्दांत पुढीलप्रमाणे दिलेली आहे—

"पुरुषांच्या ओठावर सर्वस्वी आमची सत्ता असताना, त्यांच्या ओठावर लुडबूड करणारी ही मेली कोण ?"

शेक्सपिअरनं म्हटलंय् तेच खरं—"Jealousy ! thy name is woman !" बायका केव्हा कशाचा मत्सर करतील त्याचा काही नेम आहे का ?

ते काहीही असो. सिगरेट सोडण्याचा निश्चय आपल्यापैकी प्रत्येकजण सिगरेटपासून होणारे नुकसान विशद करीत व हातातील सिगरेट विझवीत सांगत असतो. आणि २–४ दिवसांतच नवी सिगरेट पेटवून त्या निश्चयाची 'सांगताही' न चुकता करीत असतो ! 'एखादी ओढायला काय हरकत आहे !' अशा युक्तिवादानं प्रतिज्ञेचा भंग होतो आणि पुढे 'एकच प्याला'सारखी गत होते. ती एकच एक सिगरेट सारा घात करते. थोडक्यात सिगारेटचे व्यसन इतके जबरदस्त असते की, ते सुटता सुटत नाही ! पूर्णत्वाने या व्यसनाच्या आहारी गेलेल्या एखाद्या 'सिगरेट सम्राटा'-पुढे जर वरीलप्रमाणे दोन पर्याय ठेवले तर तो सुंदरीपेक्षा सिगरेटची निवड करण्याचीच शक्यता अधिक !

सारांश, सिगरेट सुटणे नाही ! आणि म्हणूनच ब्रिटनमधील इम्पीरिअल केमिकल इंडस्ट्रीजने एका महत्त्वपूर्ण संशोधनाअंती असा एक 'मसाला' तयार केला आहे की, तंबाखूऐवजी तो सिगरेटमधून वापरल्यास वरील सर्व धोके टळतील आणि सिगरेटसारखे दुराराध्य व्यसनही सोडण्याची गरज उरणार नाही ! शिवाय तंबाखू आयातीसाठी पाश्चात्त्य देशांना लागणारे परकीय चलनदेखील वाचू शकेल !

म्हणजे भविष्यात सिगरेट वा सुंदरी अशी तडजोड करावी लागणार नाही तर सिगरेट व सुंदरी दोन्हींचा स्वीकार करता येईल, अगदी थेट शर्करा व क्षीरही या न्यायाने !!

उर्दू टाईम्स (२०–४–६७)

## प्रेक्षकांचा अंत पाहायला

# आए दिन बहार के !

पेलाभर शुद्ध पाणी घ्या. त्यात एक चमचा मीठ, दोन चमचे तिखट, दोन चमचे हरबऱ्याच्या डाळीचे पीठ, चार चमचे गव्हाचं पीठ, (अमेरिकन वा ऑस्ट्रेलियन कुठलंही चालेल !) दोन कांदे चिरून टाका. झालंच तर दोन बटाटे, चार टॉमॅटो, एक काकडी...या सर्व मिश्रणापासून जो एक अनन्यसाधारण असा पदार्थ (!) तयार होईल, तो जरा चाखून पाहा ! या अजब व अद्‌भुत गोपालकाल्याची चव घेतलीत म्हणजे मग 'फिलमयुग'च्या 'आए दिन बहार के'ची निराळी चव तुम्हांला घ्यावी लागणार नाही ! तशी गरजच उरणार नाही !

**कथा नव्हे, कडबोळे !**

चित्रपट सुरू. कॅमेरा पुढील दृश्यावर स्थिर— मासे मारणारा धर्मेंद्र. चित्रपटात विनोद नव्हे, मर्कटचेष्टा पाहिजेतच म्हणून जोडीला राजेंद्रनाथ. दोघे मासे पकडायला जातात आणि गळ मात्र टाकतात नेमका आशा पारेखच्या गळ्यात ! मग काय ? हिरॉईन पडलीच हीरोच्या गळ्यात ! अर्थात् तत्पूर्वी बिचारा कॅमेरामन त्यांच्या चेहऱ्यावरील राग–अनुरागाचे भाव टिपायला मिळतील म्हणून कॅमेरा वेगवेगळ्या अँगल्स्‌मधून त्यांच्यावर स्थिर करतो. पण छे: ! त्यांच्या गुलजार व गोऱ्यागोमट्या पण भावरहित मुखड्यांशिवाय रजतपटावर दुसरं काहीच दिसत नाही !

हिरो बी. ए. पास. अगदी पहिल्या श्रेणीत. मग लग्न न जुळायला काय झाले ? परंतु लगेच लग्न लावल्यावर चित्रपटच संपायचा ! मग संघर्ष आला. गुंतागुंत आली. वाङ्‌निश्चयाच्या कार्यक्रमात अकस्मात् हीरोच्या आईच्या पूर्वायुष्याचं रहस्य उलगडतं. हीरो–हिरॉईन व आई–मुलाचीही ताटातूट. इथे कथेचा पहिला भाग संपतो. इंटरव्हलही होतो.

कथेच्या दुसऱ्या भागात फिल्मी संकेतांप्रमाणं दुःखी हीरो दारूच्या नशेत नायकिणीच्या निवासस्थानात. मारामारी, तुरुंगात व मग कोर्टात ! मॅजिस्ट्रेट 'हाच मुलाचा बाप.' मुलाची ओळख पटणे. स्वतःच्या घरी त्याला नेणे. पुढे हा मॅजिस्ट्रेटच आपला बाप असल्याचे कळणे. भर सभेत बापाला मुलाने शिव्या देणे. बापाने स्वतःचे निर्दोषत्व सिद्ध करणे...आईही नेमकी तेथे 'उपटणे'...सारं कसं यथास्थित व सुखान्त. पण चित्रपट इथे संपत नाही !

# चित्रपट

दुसऱ्या एका तरुणाशी लग्न लागणार म्हणून घरून पळून गेलेली हिरॉईन बरोबर हीरोच्याच गावी येते. ती ज्या डॉक्टरकडे नर्स असते, त्याच डॉक्टरांना हीरोच्या आईच्या उपचारार्थ पाचारण...अशा प्रकारे हीरो–हिरॉईनची पुनर्भेट होऊन कथा संपते, असं तुम्हांला वाटलं ना ? छे: ! छे: ! साफ चुकलात तुम्ही. अहो, इथे पुनः गुंतागुंत होते. परिचारिका म्हणून हिरोच्या घरी हिरॉईन जात नाही काही. तिची मैत्रीण जाते. आधी एकदा नुसतीच पडते. आणि मग झकटन् हिरोच्या प्रेमातही 'पडते' ! आईला काय कोणी तरी सून म्हणून हवीच असते. ती नर्सलाच सून म्हणून पसंत करते. पण पुढे आशा पारेख व धर्मेंद्रची गाठ पडणं, त्यानं 'बेवफा' म्हणून तिची अहवेलना करणं, तिनं जीव द्यायला म्हणून खंडाळ्याच्या घाटात पळणं, हीरोनं तिच्या मागं धावणं, तब्बल पाच मिनिटांपर्यंत पडद्यावर इंजिनचं धूड दाखवून 'थ्रिल' निर्माण करणं, वगैरे वगैरे फिल्मी सोपस्कार झाल्यावर मग कुठे हीरो–हीरॉईनची भेट होते आणि मग प्रेक्षकांची सुटका होते !

## गारुड्याची पोतडी

या चित्रपटात काय नाही ? तीन तासापर्यंत तुमच्या बुद्धीला गुंगविणारी कथा आहे ! पोट ढवळून काढणारा 'इनोद' आहे. झालंच तर महाबळेश्वर व आसामच्या रम्य परिसरात हिंडणारं प्रणयी युग्म आहे. त्यांचं चावून चावून चोथा झालेलं प्रेमाचं गुळमट गुऱ्हाळ आहे–डझनाहून अधिक गाणी आहेत. अंगोपांगाचे प्रदर्शन करणारी नृत्येही आहेत–सारं काही आहे ! शिवाय हे सारं तुम्हांला रुचेल, पचेल असं नेहमीच्या चाकोरीतलं आहे. किंबहुना, यात मुळी तुम्हांला काहीही नवं असं नाही ! यापूर्वी अनेक हिंदी चित्रपटांमधून तुम्ही ते पाहिलेलंही आहे. अगदी नावनिशिवारच सांगायचं झालं तर राज कपूरच्या 'संगम'सारखं तलावाभोवती 'पिक्चराइज' केलेलं गाणं आहे. 'मेरे मेहबूब'मधल्या साधना व अमितासारखं दोघी मैत्रिणींचं आपापल्या प्रियकराच्या श्रेष्ठत्वाविषयीचं नाचगाणंही आहे !

कित्येक दृश्ये तर थेट 'स्टॉक शॉटस्'मधून घेतल्यासारखी वाटावीत, इतकी 'सुपरिचित' आहेत !

दिग्दर्शक रघुनाथ झालानी यांची कल्पकता जर कशात दिसत असेल तर ती ही चोरलेली दृश्ये निराळ्या पद्धतीने चातुर्याने मांडण्यात !

कथा लेखक सचिन भौमिक यांनी या चित्रपटात प्रेक्षकांना जणू 'आवडेल ते घ्या !' म्हणून 'चॉईस'चा 'चान्सच' दिलेला आहे. कारण त्यांची कथा सर्वस्पर्शी नसली तरी सर्वसमावेशक आहे !

### रुपेरी कडा

रजतपट काळवंडणाऱ्या या कलाहीन कचकड्याच्या 'मेघाला' मधूनच चमचमणाऱ्या रुपेरी कडा पण आहेत, हे कसे नाकारता येईल ? उदाहरणार्थ, व्ही. बाबासाहेबांचे नेटके व स्वच्छ छायाचित्रण. महंमद रफीची दर्दपूर्ण अशी 'मेरे दुश्मन' ही गझल. बलराज सहानीचा जिवंत अभिनय.

परंतु या कडाच केवळ ! मुख्यत:, काळे मेघच पडदा व्यापतात. विशेषत: प्रेमाची अळणी पोपटपंची, ओंगळ व उत्तान प्रणयदृश्ये...आणि त्या दृश्यांत धर्मेंद्रनं भावविवश होऊन चेहऱ्यावर अक्षरश: रडवे भाव आणणं, प्रसंगी 'हिस्टेरियाच्या' रोग्याप्रमाणं कामविव्हल होणं...सारंच असह्य, असभ्य.

संगीत लक्ष्मीकांत प्यारेलाल यांचं असल्याचा दावा श्रेयफलक करतो म्हणून त्यांचं म्हणायचं ! एरव्ही यापूर्वी अनेक बोलपटांत शंकर-जयकिशन यांनी गाजविलेल्या अनेक 'ट्यून्स्' व 'ऑर्केस्ट्रा' यांचे तुकडे व मुखडे यांचं एकत्रीकरण वा मिश्रण म्हणजे या चित्रपटातलं संगीत ! यात लक्ष्मीकांत-प्यारेलाल यांच्या स्वतंत्र प्रज्ञेचे व प्रतिभेचे तर राहोच, परंतु किमान स्वत:चेही दर्शन घडत नाही !

अशी ही कथा या चित्रपटाची अन् त्याच्या इतर अंगोपांगांची !

म्हणून परमेश्वराजवळ एकच प्रार्थना-परमेशा ! आमचा अंत पाहणारे असले 'बहार के दिन' पाहण्याची शिक्षा देऊ नकोस, त्यापेक्षा शुष्क व रुक्ष शिशिरही परवडला !!

— हिदायतखान

## नटी आणि छंद

सिनेसृष्टीत अत्यंत गाजलेल्या अशा अनेक नटयांना विलक्षण अशा आवडी आहेत. ग्रेटा गार्बो हिला सापांची कात जमविण्याचा छंद होता. एलिझाबेथ टेलर हिला निरनिराळ्या आकारांचे टुथब्रश जमविण्याचा छंद आहे. तर ब्रिजीट बार्डोट हिला मंदिरांच्या कलाकृती बाळगण्याची हौस आहे. बंगाली नटी शर्मिला टागोर हिला मात्र निरनिराळ्या हॉटेलची मेनूकार्ड जमविण्याचा छंद आहे. तिने निरनिराळ्या देशांत ज्या हॉटेलांना भेटी दिल्या त्यांची मेनूकार्ड तिने जमविली आहेत.

रमेश के. सहस्रबुद्धे.

# तुमचे भविष्य आमचा अंदाज



**श्री. गो. जोशी,**
सायनाचार्य, नासिक

## दि. ६ ते १२ मे : राशिभविष्य

**मेष** : तुमचा अज्ञातवासाचा काल आता संपला. मेषराशीच्या अनेक व्यक्ती आता आघाडीवर दिसायला लागतील. सूर्यासारख्या तेजस्वी ग्रहांची उपस्थिती तुमच्या राशीत घडून आल्याने, तुमच्या व्यक्तिमत्त्वाभोवती तेजोवलय विलसू लागेल. तुमच्या कर्तृत्वाला उधाण येईल. अनेकांच्या नजरा तुमच्यावर खिळून राहतील. ११ मेच्या सूर्य-हर्षल त्रिकोणापासूनच तुमच्या साऱ्या आकर्षक योजना कार्यान्वित होऊ लागतील.

शैक्षणिक क्षेत्रात, यांत्रिक विभागांत, राजकीय क्षेत्रातही तुमचे महत्त्व खूपच वाढीस लागेल. एवढेच नव्हे तर ज्या ज्या क्षेत्रात आपण पाऊल टाकाल तेथे तेथे यश तुमच्या सामोरे येईल. दूरच्या प्रांतात गमन घडेल.

दि. १० ते १२ या कालाचे महत्त्व विशेषत्वाने जाणवू लागेल.

**वृषभ** : मंगळाची अनुकूलता आणि गुरूची कृपा लाभताच भंगलेल्या आशा-आकांक्षा कशा झटपट सांधल्या जातात याचे प्रात्यक्षिक म्हणून या वेळी तुमचाच नामनिर्देश करावा लागेल. तुमच्या-मागच्या बऱ्याचशा कटकटी आता इतिहासजमा होतील, आणि अपेक्षासाफल्याच्या उंबरठ्यावर पाऊल पडेल.

दि. ११ चा बुध–हर्षल त्रिकोण ध्यानीमनी नसलेल्या घवघवीत यशाचे माप

पदरी टाकून जाईल. नव्या कार्याला हात घालू लागाल, नव्या आशा अंकुरायला लागतील.

सांसारिक मंगलकार्याचा प्रश्न सुटेल, स्थानांतराच्या योजना दृष्टिक्षेपात यायला लागतील, आणि अनेक प्रतिस्पर्ध्यांना मागे टाकून आकर्षक प्रगतीचे स्थान पटकवाल.

दि. ६–११–१२ या कालाची नोंद करा.

**मिथुन** : तुमच्या लाभस्थानी, रवि-राहू-बुध या त्रिग्रहांची बैठक सुरू झालेली आहे. असा एखादा प्रस्ताव त्या बैठकीत मंजूर होईल की त्यामुळे तुमचे जीवन वेगाने प्रगतीकडे वाटचाल करू लागेल. प्रत्यक्ष लाभ मोठ्या प्रमाणावर होतीलच, शिवाय संपत्तिक लाभापेक्षा शतपटीने महत्त्वाची प्रतिष्ठा ध्यानीमनी नसताना लाभेल.

रुसलेल्या वाहनाची समजूत निघेल, इष्टमित्रांचे हार्दिक सहकार्य लाभेल, अनेक मार्गांनी मोठ्या प्रमाणावर पैसा हाती येऊ लागेल. आणि या अनुकूलतेमुळे आजवर स्थगित झालेल्या तुमच्या भव्य योजना या आठवड्यापासूनच गती घेऊ लागतील.

दि. १० ते १२ हा सर्वोत्तम काल हाच.

**कर्क** : पराक्रमस्थ मंगळाचे सामर्थ्य पुनश्च तुम्हांला लाभत आहे. शिवाय गुरूची कृपा सदैव आहेच. या दोन ग्रहांच्या स्वाधीनच तुमचे भवितव्य आहे. आजवर चुकत असलेले तुमचे प्रगतीचे गणित आता सहज सुलभपणे सुटू लागेल. महन्मांगल्याचा पदोपदी साक्षात्कार घडू लागेल.

याच आठवड्यात बदली-बढतीचे योग यायला लागतील. वैद्यकीय,–रासायनिक क्षेत्रांतील व्यक्तींना हा एक पर्वकाळ लाभल्यासारखे जाणवेल. शैक्षणिक यश, सामाजिक प्रतिष्ठा, राजकीय मानसन्मान यांपैकी काहीही व केव्हाही घडावे असाच या काळाचा महिमा आहे.

दि. ७–१०–१२ सर्वोत्तम यशाचे दिवस हेच.

**सिंह** : मंगळ–शनी कसेही असोत, सूर्य भाग्यस्थानी आणि तोही मेष या उच्चस्थानी. तुम्हांला आता कोणाचीही डर नाही.

या आठवड्यातील सूर्य–हर्षल त्रिकोणापासूनच (दि. ११) तुमचे व्यक्तिमत्त्व अधिक आकर्षक बनेल, व्यवसायक्षेत्राला एकदम उठाव मिळेल, परिस्थितीला अनुकूल कलाटणी मिळेल. प्रगतीचा मार्ग निर्वैर, निर्वेध बनेल.

या वेळीच नव्या व्यवसायधंद्याची आखणी करू लागाल, औद्योगिक क्षेत्रात प्रचंड उत्क्रांती घडवून आणाल, प्रामुख्याने यांत्रिक–विद्युत् क्षेत्रांत अमाप यश मिळवाल. नोकरीतील व्यक्तींना दूरचे स्थानांतर घडेल. बढती अनपेक्षितपणे मिळेल.

दि. ९ ते १२ यांतील प्रत्येक दिवस महत्त्वाचा जाणवेल.

**कन्या :** वक्री मंगळाचा धिंगाणा तुमच्या राशीत जोपर्यंत सुरू आहे तोपर्यंत स्वास्थ्याची, प्रगतीची आशा करायला यत्किंचितही जागा नाही. त्यातून दि. ९ चे सूर्यग्रहण–(आपल्याकडे प्रत्यक्ष दिसत नसले तरी)–मानसिक स्वास्थ्य भंगण्यास कारणीभूत ठरेल. बिचाऱ्या अकराव्या गुरुला तुमच्यासाठी काही भरीव कार्य करण्याची संधीच लाभणे कठीण.

खर्च आटोक्याबाहेर जाईल, सभोवारचे वातावरण प्रतिकूल दिसू लागेल. झगडूनसुद्धा यश मिळेलच अशी खात्री नाही.

मुख्यत: या वेळी प्रकृतीला विशेषच जपा. नोकरीधंद्यात अनेक समस्या निर्माण व्हायला लागल्यामुळे मन हताश व उद्विग्न बनेल.

दि. १० ते १२ या काळी थोडेफार यश पदरी पडावे.

**तूळ :** मंगळ व्ययात म्हणजे, अपयशाला निमंत्रणच. पैशापरी पैसा खर्च होऊनही अपेक्षेप्रमाणे काहीच घडेनासे झाले म्हणजे मन उद्विग्न होणे साहजिकच आहे. या वेळी रवी–राहूचीही सहानुभूती आपण गमावून बसाल. सध्याच्या कमाल महागाईचे चटके अधिकाधिक जाणवतील फक्त कन्याराशी व्यक्तींनाच.

याच वेळी हितशत्रूंना फावेल. ते मागील दाराने प्रवेश करतील आणि तुमचे अस्तित्व धोक्यात आणण्याचा प्रयत्न करतील. जपून, सावधगिरीने वागायला हवे. पैशाअडक्याच्या व्यवहारात डोळ्यांत तेल घालून सारे पाहायला हवे.

नोकरीधंद्यात काही फार मोठे उत्पात होणार नाहीत, पण अपेक्षेप्रमाणे काही घडेल असे नाही. या वेळी डॉक्टर-वकिलांची बिले द्यावी लागतील.

दि. १० ते १२ अल्पसे साहाय्य लाभेल.

**वृश्चिक :** या आठवड्यातील सर्वांत यशस्वी राशी वृश्चिक. त्या राशीच्या व्यक्तींना केव्हा, कुठे, कशांतही उणीव भासू शकणार नाही. जाल तिथे आवाज उठवाल. कराल त्यात घवघवीत यश संपादन कराल. या वेळी तुमचे प्रगतीचे गणित तुम्हाला कोणाच्याही मदतीशिवाय झटपट सुटेल. वैचारिक संघर्ष मिटतील. विरोधकही हातमिळवणी करू लागतील. अवघड–अशक्य वाटणारी कामेही अल्पावधीत यशस्वी करून दाखवू शकाल. भाग्यस्थ गुरूचे अचाट सामर्थ्य आताच प्रत्ययास यावे.

या वेळच्या सूर्य-हर्षल त्रिकोणापासून प्रगतीच्या नव्या वाटा दिसायला लागतील आणि राजकीय क्षेत्रातही तुमच्या नावाला विशेष महत्त्व चढू लागेल.

दि. ११-१२ या काळाचे महत्त्व विशेषच जाणवेल.

**धनू :** या आठवड्यातील सूर्य-हर्षल त्रिकोण योगावरच तुमचे भवितव्य केंद्रित झाले आहे. या योगामुळे काही अघटित, लोकविलक्षण, अनन्यसाधारण अशा (चांगल्या) घटना भराभर घडून यायला लागतील. मुख्यत:, यांत्रिक-औद्योगिक क्षेत्रांत तुमचा प्रवेश घडेल आणि तेथे नजीकच्या भविष्यकाळात नेत्रदीपक यशही

मिळेल. गुरु-शनीसारखे मोठाले ग्रह अनुकूल नाहीत म्हणून कच खाऊ नका, माघार घेऊ नका. तुमच्या निर्धार-निष्ठेचे तपोबल पाहून त्या अनिष्ट ग्रहांनाही तुमच्या प्रगतीच्या आड येण्याचे साहस करवणार नाही. याचा अर्थ असा नव्हे की, सहजासहजी काही घडेल. प्रयत्नांची शिकस्त केली पाहिजे. जिवाचे रान करायला पाहिजे.

दि. १० ते १२ एवढेच दिवस प्रगतीला पोषक.

**मकर** : या वेळी सूर्यग्रहण (दि. ९) चतुर्थात होणार आहे. पण गुरु-मंगळादी अनेक ग्रहांचे सामर्थ्य आपल्या पाठीशी उभे आहे. अंगीकृत कार्यात अडीअडचणी उद्भवतील, पण त्यांना आपण ठोकरून काढू शकाल. संघर्ष-मतभेदांच्या ठिणग्या उडतीलही—पण त्या ठिणगीमुळेच प्रकाश पडेल, प्रगतिपथ लख्ख दिसू लागेल.

प्रामुख्याने मकर राशीच्या अनेक व्यक्ती राजकीय क्षेत्रात आघाडीवर दिसू लागतील. प्रतिष्ठेच्या अत्युच्च स्थानावर त्यांचीच नियुक्ती होईल. दूरच्या दौऱ्यावर निघावे लागेल. फार मोठ्या जबाबदाऱ्या उचलाव्या लागतील, व्यवहारक्षेत्रातही भव्यदिव्य करून दाखवण्यास उद्युक्त व्हाल.

दि. १०-१२ येथूनच आपल्या चारित्र्याला उत्थान मिळावे.

**कुंभ** : वक्री मंगळ आणि तोही अष्टमस्थानी. अशा वेळी काहीसे जपूनच वागावे लागते. थोडासा अनवधानपणाही क्षम्य समजला जाणार नाही. साडेसातीतील लोकांना सावधानतेचे व्रत निष्ठेने पाळावेच लागते.

या महिन्यात धावपळ-धडपड खूपच होईल. अनेक अवघड कामांत मध्यस्थाची भूमिका वठवावी लागेल, थोरांचे सहकार्य घेऊन सरकारी कामेही निपटून काढावी लागतील.

अपेक्षाभंग अपयश, असे काही घडणार नाही. पण मनावर ताण पडणाऱ्या व खर्चाचे मान खूप वाढवणाऱ्या घटना घडून यायला लागतील. स्थावराचा प्रश्नही या आठवड्यात सुटावा.

दि. ७-९-१०-११ या कालाचे महत्त्व विशेष जाणवेल.

**मीन** : तुमच्या राशीबद्दल अजूनही मी फारसे चांगले लिहू शकत नाही. क्षमा करा. या वेळी तर मंगळ तुमच्या राशीसमोर आलेला आहे. तो कौटुंबिक वातावरण बिघडवील, व्यावसायिक क्षेत्रात अनेक अडीअडचणी निर्माण करील. भागीदारीचा व्यवहार करणाऱ्यांनी तर फार फार नमते घेऊन वागायचे ठरविले तरच निभाव लागेल. मतभेद-संघर्ष-वादविवाद यांना तर अगदी ऊत येईल.

आरोग्य, पैसा या दृष्टींनीही हे दिवस ठीक दिसत नाहीत. मंगळ मार्गी होईतोपर्यंत सहन करणे भाग आहे.

दि. १० ते १२ एवढेच दिवस थोडेसे अनुकूल.

●

# राजा शिवछत्रपति

**१०० रुपयांची ठेव**

**६ वर्षांसाठी**


- 'राजहंस प्रकाशन संस्थे' कडे ठेवल्यास सुमारे सात टक्के व्याजाच्या मोबदल्यात हा ग्रंथ प्रसिद्धीनंतर तावडतोब विनामूल्य घरपोच मिळेल.
- ठेवीची रक्कम 'राजहंस प्रकाशन' या नावे ड्राफ्टने वा म. ऑ.ने पाठवावी. सोबत नाव, पत्ता संपूर्ण असावा.
- चेक असल्यास तो पुणे-मुंबई बँकेवरचा असावा. इतर ठिकाणच्या बँकेवरचा चेक असल्यास ७५ पैसे वटणावळ अधिक पाठवावी.

ब. मो. पुरंदरे

राजहंस प्रकाशन

४१९ नारायण, पुणे

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M H–649




राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर.**